म. ग्रं. सं. ठाणे
चरित्र
९९१
RFL BK-0002480

# चरित्रमालिका.

कलिका ३ री.

# बाल-बंकिमचंद्र.

संपादक

भाऊ श्रीधर कुळकर्णी.

प्रकाशक

वि. बापट अँन्ड ब्रदर्स.

...र्स, बुधवार पेठ, पुणें शहर

प्रथमावृत्ति ] १९२४ [ किंमत ४ आणे.

RFL BK-0002480

ग्रंथ संग्रहालय
नं.
ग्रंथ संग्रहालय
ग्रंथ नं. २०
३१०१

# प्रास्ताविक—

ज्या थोर महात्मा पुरुषानीं आपला देह चंदनाप्रमाणें झिजवून कीर्ति संपादन केली त्यांची चरित्रें सर्वांस आवडती तर होतीलच परंतु मार्गदर्शकही होतील हें जाणून मुद्दाम ही माला आम्ही काढीत आहोंत. लहानपणीं कोंवळ्या मनावर जो ठसा उमटवावा तो चांगला उमटत असतो, म्हणूनच आम्ही लहान मुलांकरितां ही चरित्र मालिका गुंफण्याचा प्रयत्न करीत आहोंत. त्या चरित्र—मालिकेपैकीं हें पहिलें पुष्प आम्ही आमच्या वाचकाचे हातीं देवून ठेवीत आहोंत. हें कसें काय वठलें आहे हें पाहण्याचें काम वाचक वर्गाचें आहे.

ज्यांचीं चरित्रें सर्वांस बोधदायक होतील अशा थोर पुरुषांचीं चरित्रें ओळीनें गुंफुन ही मालिका आम्ही तयार करणार आहोत. यांत कोणत्याही प्रकारचा भेदभाव ठेवणार नाहीं. ' थोडाही गुण मिळतां घ्यावा, असा जरी उपदेश आहे तरी ज्ञानाचा साठा ज्याचे जवळ आहे अशा थोर विभुतींचीं चरित्रें का उपयोग करणार नाहींत ? प्रत्येक चरित्रापासून काय शिकावें हेंही आम्ही दाखविण्याचा प्रयत्न करणार आहोंत.

मोठे लोक कसें झाले ? त्याचें अंगीं काय गुण होतें ? ते गुण घेतल्यास मोठेपणा मिळविता येईल कीं नाहीं या गोष्टीचा चरित्र लिहिताना विचार करूनच चरित्रें लिहिलीं जातील. मोठ्या लोकाचा मोठेपणा त्यांच्या बालपणातच असतो, तो मला आमच्या बालवाचास जास्त उपयोगी असल्यानें तो होतां होईल तितका सरळ लिहिला आहे.

या पुष्पातील चांगला असा रस तेवढा लहान मुलानीं भुंग्याप्रमाणे सेवन करून आपल्यावरचीं ऋणें ओळखून तीं ऋणें फेडण्यास तयार

व्हावें. या कामीं या चारित्र मालिकेचा थोडा जरी उपयोग झाला तरीं मी माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मी समजेन.

सदरमाला काढण्याचें सर्व श्रेय आमचे परमस्नेही श्री. आनंदराव बापट यांचेंकडे आहे. त्यांचे या कामीं प्रोत्साहन मिळालें नसतें तर आमचा हा उद्देश मुळींच तडीस गेला नसता हे खास. लेखकी जबाबदारी आमचेवर असली तरी बाकीची सर्व जबाबदारी त्यांचे वरच आहे. तेव्हा त्यांचे आभार मानणें भागच आहे.

सत्य संकल्पाचा दाता भगवान
सर्व करी पूर्ण मनोरथ ॥

संपादक.
भाऊ श्रीधर कुलकर्णी.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

ॐ

# अर्पण-पत्रिका !

ज्याच्या कर्तव्यावर भारतभूचें भवीतव्य
अवलंबून आहे अशा भावी
राष्ट्रस्तंभास—पण

आजच्या

## बालवाचकांस

ही मालेची तिसरी कलिका अर्पण करीत आहे.
ते स्विकार करून यातील गुण ग्रहण करोत.

आनंद-भुवन ऑफिस
पुणें शहर.
२६–४–१९२४.

लेखक,
भाऊ श्रीधर कुळकर्णी
संपादक—बाल चरित्र माला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
2850

# बाल–चरित्रमालिका.

## कलिका ३ री.

—:*:—

# बाल बंकिमचंद्र

## प्रकरण १ लें.

### आरंभीचे चार शब्द.

माझ्या बाल मित्रांनो ! मी तुम्हाला थोरामोठ्यांची चरित्रें गोष्टी रूपानें सांगणार आहे. अशा गोष्टी पासून तुमचा फार फायदा होणार आहे. हा फायदा कोणता व तो कसा करून घ्यावा हेंही मी तुम्हाला सांगणार आहे तेव्हां तुम्ही आतां नीट लक्षपूर्वक मात्र ऐका.

आम्ही जी चरित्र–मालिका गोविण्याचें ठरविलें आहे त्यांत आम्ही बंगाल्यांतील बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांचें चरित्राने सुरवात करीत आहोंत. आपल्या या महाराष्ट्रांत अनेक थोर पुरुष होऊन गेले आहेत. त्यांचींही चरित्रें आम्ही यथावकाश देणार आहोंत. प्रथम परप्रांतीय पाहुणें म्हणून बंकिमबाबूंस मान देत आहोंत. शिवाय बंकिमबाबूही तशाच योग्यतेचे आहेत. त्यांचा गौरव सर्व बंगाल प्रांतभर होत आहे. "साहित्य सम्राट" म्हणून त्यांचा गौरव आहे. अशा या विद्वान पुरुषाची मी तुम्हाला ओळख करून देण्याचा विचार करून तुमच्या

पुढें येत आहे. चरित्र नीट काळजीनें वाचून त्यावर विचार करा व थोरांचे पावलांवर पाऊलें टाकून तुम्हीही थोर व्हा. अशा कामास थोरांचीं चरित्रें हा एक सुलभ राजमार्ग आहे हें लक्षात ठेवा.

---

## प्रकरण २ रें.

# पूर्व हकिकत.

हकिमबाबूचें घराणें चांगल्यापैकीं आहे, तरी पण त्याचे वडील काही गर्भश्रीमंत नव्हते. त्याचे चुलते काशीनाथ चट्टोपाध्याय हे अब कारी खात्यात नोकर होते. ही नोकरी मोठी नसून त्याचेकडे फक्त दरोगागिरी होती.

यांचा मुळगाव बंगाल्यातील कांटोलपाडा हा होता परंतु काशीनाथ बाबु तेथें न राहता नोकरी करिता म्हणून बाजपुरास रहात असत. काशीनाथ बाबुस यादवचंद्र म्हणून एक लहान भाऊ होता, तोही शिक्षणाकरितां म्हणून त्यांचे जवळ येऊन राहिला होता. ते दिवस आताप्रमाणें शांततेचे नव्हते. बंगाल प्रांतावर 'ईस्ट–इंडिया,' कंपनीचा जरी ताबा होता तरी व्हावी तशी व्यवस्था झाली नव्हती. पूर्वीची घडी विस्कटली त्यामुळें चोहींकडे अशांतता, दंगेधोपे, दरवडे याचा अगदीं सुकाळ झाला असे.

त्यावेळीं इंग्रजी भाषेची स्थिती हल्लींप्रमाणें नव्हती. ही भाषा त्यावेळीं परकी असल्यानें इच्याकडे विशेष लक्ष कोणी देत नसे. आरबी व पारशी या दोन भाषेंतच कामें चालत असत. सरकारी नोकरी करणारांस या दोन भाषा चांगल्या यावयास पाहिजे होत्या. यादवचंद्रानें या दोन्ही

भाषा आपल्याशा करून घेतल्या. एवढ्यानें त्याची तृप्ती न होतां त्यानें इंग्लिश भाषेला सुरवात केली. इंग्लिश जाणणारे लोक त्यावेळीं फार कमी होते. या कारणानें थोडे जरी इंग्लिश शिकला तर त्याला चांगला मान मिळत असे. यादवचंद्राची बुद्धी तरतरीत असल्यानें त्याची ख्याती होऊं लागली.

अशा स्थितींत यादवचंद्रास विषमज्वरानें गाठलें. त्याचे कानाचे मागें एक मोठी गांठ उठली. वैद्यांनीं हात टेंकिले. अगदीं अखेरची वेळ येऊन ठेपली असेंच सर्वांना वाटूं लागलें. या यमाच्या दाढेंतून एका सन्याशानें त्याला वांचविलें. यादवचंद्राचा हा पुनर्जन्मच झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. या कारणानें यादवचंद्राची त्या सन्याशावर अत्यंत भक्ती जडली. तो त्या सन्याशाबरोबर जावयास निघाला परंतु ही गोष्ट त्यानें कबूल केली नाहीं. संसारात राहूनच तूं आपलें कर्तव्य बजाव असा त्यानें उपदेश केला.

यानंतर कांहीं कालानें पुन्हा त्या सन्याशाचें यादवचंद्रास दर्शन झालें. यादवचंद्रानें पुन्हा बरोबर येण्याची गोष्ट काढिली तेव्हा सन्याशानें सांगितलें कीं, संसारात आपल्या धर्माप्रमाणें वागून मोक्षप्राप्ती करून घेतां येते. तूं कांही संसार सोडूं नकोस. एक महापुरुष तुझ्या पोटीं जन्म घेणार आहे. या योगानें तुझें कुलाचा सुद्धा उद्धार होईल."

असें म्हणून त्या सन्याशानें पादुका यादवचंद्राचें स्वाधीन केल्या व मी पुन्हा भेटेन असें सांगून तो अदृश्य झाला.

यानंतर कांहीं काळ निघून गेला. यादवचंद्राचें शिक्षण पुरें झाल्यावर संसाराचा भार त्यांचेवर पडला तेव्हा त्यांना नोकरी पहावी लागली. प्रथम अबकारी खात्यात त्यांना मिळाल्या ' दरोगा, व्हावें लागलें. परंतु त्यांची बुद्धी तीक्ष्ण असून काम करण्याची हातोटी चांगली होती.

त्यामुळे वरचे अधिकारी संतुष्ट असत. लवकरच ते सरकारीचे डेप्युटी कलेक्टर बनले.

पैशाचीही स्थिती सुधारली होती. विवाह होऊन गेलाच होता. घरीं चार दोन दासदासी दिसूं लागल्या. मानमान्यताही वाढली. ही सर्व सद्‌गुरूची कृपा आहे असें यादवचंद्र नेहमीं म्हणत असत. आपल्या प्राणदात्या सन्याशास ते विसरले तर नाहींतच परंतु दिवसेंदिवस त्यांचें मनात त्यांचेविषयीं श्रद्धा वाढत चालली होती. त्याना शामाचरण व संजीवचंद्र हे दोन पुत्रही झाले होते. संतती व संपत्ती याचा मिलाफ जमला होता. अशाच स्थितींत आपले चरित्रनायक जन्मास आले.

---

## प्रकरण ३ रें.

# जन्म व बालपण !

बाल मित्रांनो ! तुम्हाला इतिहास माहित आहेच. आपले चरित्र-नायक बंकिमबाबु जेव्हा जन्मले तेव्हांचा काल कसा होता हें आपल्याला पाहिलें पाहिजे. काल अनुकूल असतां कीर्ती मिळविणें वेगळें व काल प्रतिकूल असता कीर्ती मिळविणें वेगळें. बंकिमबाबूंचा जन्मकाल व त्यावेळची एकदर देशाची स्थिती याचा विचार केला असता खरोखर आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं.

'ईस्ट-इंडिया कंपनी' ही व्यापार करावयास इकडे आली व व्यापार करीत असताच राज्यकारभारात शिरकाव करून तिनें एकेक प्रांत आपल्या सत्तेखालीं घेतला. ही गोष्ट इतिहास सांगतो आहे. आठराव्या शतकाचे शेवटीं व एकोणिस शतकारंभीं राज्यसत्ता या कंपनीकडे

झाली तरी त्या सत्तेला पाहिजे तशी बळकटी आली नव्हती. आपण ब्रिटिश राज्यसत्तेचा इतिहास पाहूं लागलो तर १८५७ च्या बंडा-पर्यंत यांचेकडे बंडाळीच सुरू होती असें दिसून येईल. नंतर पुढें मात्र या राज्यसत्तेला कांहीं आळा बसत जाऊन राज्य व्यवस्था नीट चालूं लागली. कोणतीही राज्यसत्ता स्थापित होण्यापूर्वी, ती होत असतां व झाल्या नंतरही कांहीं काल धुमाकूळ, युद्धं आढळून येतात. हें ऐति-हासिक सत्य आहे. हा विषय इंग्लिश राज्य सत्तेलाही लागू पडतो. मुसलमान राजसत्तेस लोक असले म्हणून त्यांतून सुटका करून घेण्या-करितां बंगाल्यांत ' सतान ' लोकांनीं बंड केलं होतं. या नंतरही पन्नास वर्षें निघून गेलीं होतीं, तरी राज्य कारभाराची घडी बसली नव्हती. देशांत शांतता असल्याशिवाय शिक्षणाकडे कोणाचें लक्ष कसें जाणार ? तरी पण नोकर तयार करण्याकरितां कांहीं ठिकाणी इंग्रजी शाळा चाल-विणेंच भाग होतं.

अशा स्थितींत यादवचंद्रास १८३८ च्या जून महिन्याच्या २७ व्या तारखेस पुत्ररत्न झालं. आपल्याकडे जसा शक सुरू आहे तसा बंगा-ल्यांत वेगळा शक आहे. चैत्र, वैशाख वगैरे महिनें आपल्यासारखेच आहेत. खरें परंतु आपल्याप्रमाणें तिकडे शुद्ध व वद्य हे पक्ष न मानतां तारखेप्रमाणें १ पासून ३० पर्यंत मोजतात. याप्रमाणें बंकिमचा जन्म १३ आषाढ १२४५ सालीं झाला. हाच आपला चरित्र नायक बंकिमचंद्र होय.

बालपणच्या बाल–लीला वर्णन करून जागा अडविणें बरें नव्हे. परंतु या बाल खेळांतही एक प्रकारचें विशेषत्व आढळून आल्याशिवाय रहात नाहीं. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात. अशी एक म्हण आपल्यांत आहे. तिचें सार हेंच होय. मुलाचे खेळ, विचार, आचार हीं जर

सूक्ष्मपणें अवलोकन केली तर तो मुलगा मोठेपणीं कसा होईल याचा तर्क बांधता येतो. मोठे लोकांचें बालपणसुद्धा पाहण्यासारखें असतें.

यादवचंद्र यावेळीं मेदिनीपुरास होते. त्यांनीं तेथें बंकिमचंद्र व त्यांची आई यांना नेलें. याच ठिकाणीं बंकिमबाबुंची वयाची पहिली पांच वर्षे गेलीं. मुलगा पांच वर्षांचा झाला म्हणजे श्रीसरस्वतीपूजन करून त्याला शिकविण्यास सुरवात करण्याची पद्धत आपल्याकडेही आहे त्याचप्रमाणें बंगालप्रांतातही आहे. बंकिमबाबुस यावेळीं श्रीसरस्वतीपूजन करून शिकविण्यास सुरवात केली. यादवचंद्रांनीं याकरितां रामप्राण सरकार नामक पंतोजींची नेमणूक केली.

सरस्वतीपूजनानंतर पंतोजींनीं बाल बंकिमचा हात धरून मुळाक्षरें काढिलीं, एकदा वाचून घेतलींत. तेवढ्यानें बंकिमचें काम झालें. पंतोजींना काहीं पुन्हा तीं अक्षरें काढून द्यावीं लागलीं नाहींत किंवा वाचूनहीं द्यावीं लागलीं नाहीं. पांच वर्षांच्या बाल बंकिमचंद्रानें फक्त एका दिवसांतच सर्व बंगाली मुळाक्षरें तयार केलीं. याचें नांव बुद्धी ! हा प्रकार पाहून पंतोजींनीं तोंडांत बोटच घातलें. या वयाच्या मुलाकडून दररोज एक 'अक्षर' तयार होण्याची मारामार. मग पंतोजींना आश्चर्य तरी कां वाटूं नये ? दुसरे दिवशीं बंकिमबाबूंनीं एकेक अक्षर वाचण्यास सुरवात केली. पंतोजींनीं एकवेळ सांगावें ते बंकिमचंद्रांनीं तयार करावें असा सारखा क्रम सुरू होता. यावरून बंकिमबाबूंची बुद्धी सामान्य कोटींपैकीं नसून असामान्य होती हें समजून चुकलेच असेल.

बंकिमबाबूंची ही असामान्य बुद्धी पाहून त्याचे पंतोजीसुद्धा विचारांत पडले. आपल्या जवळील ज्ञानाचा सांठा आतां लवकरच संपून जाणार अशी त्यांची पूर्ण खात्री होऊन चुकली. एकाक्षरी शब्दानंतर दोन तीन अक्षरांचे शब्द झाले. बाराखड्या संपविल्या. हें शिक्षण वरीच झालें.

शिक्षणास सुरवात झाल्यानंतर आठ नऊ महिन्यांत बंकिमबाबूंनीं इतकी प्रगती करून घेतली. मग त्यांना शाळेंत दाखल करण्यांत आलें.

आताप्रमाणें पूर्वीं व्यवस्थावार अभ्यासक्रम ठरला नव्हता तरी जरूरीचे व महत्त्वाचे सर्व विषय व्हावेंच लागत असत. शिक्षण पद्धतींतील सुधारणेप्रमाणें या शिक्षणक्रमांत नवीन विषयांची भर पडली आहे ही गोष्ट वेगळी. महत्त्वाचे विषय बंकिमबाबूंनीं शाळेंत गेल्यापासून केवळ दोन वर्षांत पुरे केले बंगाली भाषेंत शिकावयाचें असें कांहीं ठेविलें नाहीं. कोण ही बुद्धी ! काय ही चिकाटी !

---

मराठी ग्रंथ संग्र... मा. ... ाणे.

## प्रकरण ४ थें.

# अभ्यास.

बंगाली भाषेचा अभ्यास संपल्यानंतर वयाच्या सातव्या वर्षी बंकिमबाबूस प्रथम मेदिनीपुरास इंग्रजी शाळेत घातला. त्यावेळीं इंग्लिश शिकलेले लोक फार थोडे असल्यानें व त्यांची जरूरी फार असल्यानें सहजच महत्व आलें होतें. इंग्लिश स्कूलमध्यें गेल्यावर बंकिमबाबूस एक नवीनच चालन मिळालें. ( परकीभाषा शिकावयाची म्हटल्यास हल्लींसुद्धां किती त्रास पडतो किती अभ्यास करावा लागतो याची जाणीव आमच्या बालवाचकास आहेच. ) लहानपणीं परकीभाषेचा प्रथम बाऊ वाटत असतो परंतु बंकिमबाबुस तसें कांहीं वाटलें नाहीं. आपल्याला एक नवीन अभ्यास मिळाला म्हणून त्यांना अत्यंत आनंद झाला व ते मोठ्या झपाट्यानें अभ्यास करू लागले.

अक्षर ओळख अगदीं सहज झाली. इंग्लिश उच्चार पद्धती ठराविक असल्याने नवीन शिकणारास ती त्रास दायक होत असते. स्पेलिंग व

उच्चार घोकून घोकून पाठ केल्याशिवाय मुळीं भागतच नाहीं. परंतु बंकिमबाबूंची बुद्धि तीव्र असल्यामुळें त्यांना मुळीं घोकावेंच लागलें नाहीं. एकदां सांगितलें व त्यांना तें समजलें कीं, तें कायम झालें. प्रत्येक विषय नीट समजून घेतल्याशिवाय मात्र ते कधीं समजलें म्हणत नसत. अशा तऱ्हेनें त्यांनीं पहिला नंबर पटकाविला तो कायमचा. पहिला नंबर त्याचा कधींसुद्धा हालला नाहीं. प्रत्येक विषयांत पहिला, परिक्षेंत पहिला असा नंबर बंकिमबाबूंचा असावयाचा असेंच ठरून गेल्यासारखें झालें.

रत्नास कोठेंही ठेविलें तरी तें आपल्या तेजानें चमकणारच. त्या रत्नास योग्य कोंदण मिळाल्यास त्याच्या तेजांत भरच पडणार. बंकिमबाबूंच्या विशाल बुद्धिमत्तेस इंग्रजी शिक्षणासारखी जोड मिळाल्याबरोबर ती बुद्धी विशेष चमकूं लागली. त्यांची ती विशालबुद्धिमत्ता पाहून शिक्षक वर्गास सुद्धां आश्चर्य वाटलें. यावेळीं ते ठराविक शिक्षणाचे दुप्पट अभ्यास करीत असत म्हणजे वर्षांतून एका इयत्तेचा अभ्यास इतर मुलें करीत असली तर हे दोन इयत्ता करीत. इतकें करूनही त्याचा नंबर पहिला असे तो कायमच. अशा कोमल मुलाकडून अशा तऱ्हेनें अभ्यास करून घेतल्यास त्याच्या शरिरावर परिणाम होईल म्हणून शिक्षकांनीं हा क्रम सोडून दिला.

बंकिमबाबूस अकरावें वर्ष लागलें तेव्हां यादवचंद्राची बदली चोवीस परगण्यास झाली. यामुळें या सर्व मंडळीस मेदिनीपूर सोडून कांटालपाडा या गांवीं यावें लागलें. याचवेळीं बंकिमबाबूस हुगळी कॉलेज मध्यें घातलें. कॉलेजमध्यें कित्येक विद्यार्थी वर्षभर अभ्यास करूनही नापास होतात हें ऐकून बंकिमबाबूस आश्चर्य वाटत असे व तो हसत असे. हें हंसणं अगदीं त्यांना शोभण्यासारखें होतें.

कॉलेजांत प्रवेश केल्याबरोबर बंकिमबाबूंस आनंदाचें भरतें आलें. आतां आपण किती शिकूं, किती तरी वाचूं, आपल्याला नवीन कितीतरी ज्ञान मिळेल, असें त्यांना होऊन गेलें. आपल्या तीक्ष्णबुद्धीस त्यांनीं सतत उद्योग, स्मरण शक्ती, याची चांगली जोड दिली. दृढ निश्चयानें शिक्षणास त्यानीं सुरवात केली. या निश्चयाचें फळ त्यांना मिळाल्याशिवाय कसें राहील ?

परंतु त्याचा हा आनंद फार काल टिकला नाहीं. कॉलेजमध्यें एकच विषय पुष्कळ कालपर्यंत तोच तो शिकविला जात असे. ही गोष्ट बंकिमबाबूंस कटाळवाणी वाटूं लागली. एक विषय एकदा समजावून घेतला म्हणजे भागलें असें त्याना वाटत असें. त्यांचे सारखे दुसरे विद्यार्थी नसल्यानें शिक्षकांना तोच तो विषय वरचेवर सांगावा लागत असे. ही स्थिती त्याना काहीं सहन होईना. कॉलेज मधल्या अभ्यासास कारण थोडा वेळ लागत असे व बाकी वेळ फारच रहात असे त्याचें काय करावें असें बंकिमबाबूंस वाटूं लागलें. कॉलेज मधल्या परिक्षेपुरत्या तयार केलेल्या पुस्तकानें बंकिमबाबूंची तृप्ती होईना. नवीन नवीन जितकें ज्ञान मिळेल तितकें थोडें आहे असेंच त्यांना वाटूं लागलें. केवळ परीक्षा देण्याकरिता शिकावयाचें नसून ज्ञानाकरितां शिकावयाचें आहे असा त्यांचा ग्रह होता. अशी दृष्टी प्रत्येक विद्यार्थ्यांत असणेंच जरूर आहे.

इच्छा असली म्हणजे मार्ग सुचतात, असें म्हणतात. कोणत्याही गोष्टी बद्दल इच्छा प्रबळ झाली म्हणजे मग मार्ग सुचूं लागतात. खरी इच्छा नसली म्हणजे मग सर्व अडचणीच दिसूं लागतात. शाळेंतून सुटल्या बरोबर खेळावयास जाणारे विद्यार्थी पुष्कळ सांपडतात. इतकेंच नव्हे तर शाळेत असतांना सुद्धा खेळाकडे लक्ष असलेले विद्यार्थी कमी असतात असें नाहीं. शरिरास व्यायामाची जरूरी आहे खरी परंतु तेवढ्या-

करितां सर्व वेळ घालवावा असें कांहीं नाहीं. अशा विद्यार्थ्यांची दृष्टी व्यायामाकडे नसून खेळाकडे असते. पत्त्यासारख्या खेळात वेळ घालविणारे विद्यार्थी कांहीं कमी नसतात. गप्पा मारणें हा एक खेळच असतो. यांत त्याचा वेळ किती जातो, हें टिप्पण ठेवल्यास सहज कळून येणार आहे. ही स्थिती लहान शाळेपासून तहत उच्च प्रतीचें शिक्षण देणाऱ्या कॉलेजपर्यंत दिसून येते. अभ्यास करणें हें जसें विद्यार्थ्यांचें कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें शरीरसंपत्ती रक्षण करणे, शक्ती वाढविणें हेंही कर्तव्य आहे. याकडे कोणी दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. बंकिमबाबू विद्यार्थ्यांत कधीं फारसे मिसळत नसत. बैठकीचे खेळ, गप्पा वगैरे मजलसींत ते मुळीच भाग घेत नसत. त्यांना या गोष्टींचा अत्यंत तिटकारा होता. असा त्यांचा स्वभाव असल्यानें त्यांचा मुळीं वेळच जात नसे.

बंकिमबाबूंनीं विचार करून वाचन वाढविण्याचें ठरविलें. परंतु या कामीं मुख्यतः दोन अडचणी असतात. शास्त्रीय विषयावरील पुस्तकें प्रौढ भाषेंत लिहिलीं गेलीं असल्याने तीं नीट समजत नाहींत. दुसरी अडचण म्हटली म्हणजे अवांतर वाचनाचे मार्ग लागल्यास चालू अभ्यास कमी पडून नंबर खालीं जाण्याचें भय. नंबर खाली गेला म्हणजे घरची मंडळी बोलतील असें त्यांना सहजच वाटलें. या गोष्टींचा नीट विचार करून बंकिमबाबूंनीं प्रथम कॉलेज मधलीं अभ्यासाचीं सर्व पुस्तकें एक-वेळ नीट पाहून टाकिलीं. नंतर ते इतर पुस्तकाकडे वळले. कॉलेज-मधील एक वर्षाचा अभ्यास त्यांनीं एका महिन्यात पुरा केला. हाबद्दल त्यांनीं फार खबरदारी घेतली होती. कॉलेजमध्यें पुढें येणारे विषयसुद्धां त्यांनीं करून टाकिले. इतिहास, साहित्य, अशा तऱ्हेचे विषय त्यांनीं सहज करून अभ्यासाची व्यवस्था केली.

बंकिमबाबूंना वाचनाची गोडी फार लागली होती. अभ्यासाशिवाय वेळ सापडे तो ते वाचनांत घालवीत असत. त्यांना तसें साधनही मिळालें. हुगळी कॉलेजची लायब्ररी फार मोठी होती. निरनिराळ्या विषया-वरील ग्रंथांचा संग्रह फारच होता. त्या लायब्ररींतून पुस्तकें आणून वाचीत असतां त्यांना एक भय वाटत असें. कॉलेजचा अभ्यास सोडून अवांतर पुस्तकें वाचलेलीं शिक्षकांना खपणार नाहीं. इतक्या लहान वयात शास्त्रीय विषयावरील ग्रंथ वाचले तर काहीं समजणार नाहीं. म्हणून शिक्षक हस-तील, आपल्याला वाचनाची बंदी करतील. म्हणून बंकिमबाबू हें वाचन शिक्षकास चोरून करीत असत. लायब्ररींत एकीकडे बसून अगदीं मुका-ट्यानें वाचीत असत. ज्ञानलालसा एकदां उत्पन्न झाली कीं ती पूर्ण करावयास अशा तऱ्हेनें प्रयत्न करावे लागतात. ज्ञानाशिवाय मोठेपण नाहीं. "चणे खावें लोखंडाचे। तेव्हां ब्रह्मपदीं नाचे॥ असें म्हणतात तें यालाच. ज्ञान संपादन करण्यास श्रमाची फार किंमत द्यावी लागते म्हणून तर ज्ञानाची थोरवी सर्वत्र वर्णिली आहे. प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण यांनीं आपल्या गीतेंत 'ज्ञाना सारखी उच्च व पवित्र वस्तु जगात नाहीं.' असें सांगितलें आहे.

वाचन म्हटलें कीं, सहजच कादंबऱ्या, नाटकें याकडे विशेष लक्ष असतें. हे वाचन असू नये, असें नाहीं परंतु त्यातला टाकाऊ भाग, हिडिस भाग तेवढाच घेतात यामुळें याचा दुष्परिणाम मात्र दिसून येतो. सर्व कादंबऱ्या व नाटकें अशीं असतात असें नाहीं, काहीं काद-बऱ्या व नाटकें मुलांनीं अवश्य वाचावीं अशींच आहेत. बंकिमबाबूंनीं वाचनास सुरुवात केली. ती कादंबऱ्या, नाटकें नसून शास्त्रीय विषया-वरील ग्रंथ होते. हें वाचन म्हटले म्हणजे वेळ जाण्याकरितां नसून तो विषय समजावून घेऊन नीट मनन पूर्वक ते वाचीत असत. वाचन कसें असावें, कसें वाचावे, हें सुद्धा समजून घ्यावें लागत असतें. खूप वाचून

काढिलें म्हणजे भागलें असें कांहीं नाहीं. जें कांहीं वाचावयाचें असेल तें मनन पूर्वक वाचलें पाहिजे. असें वाचन जरी थोडे झालें तरी त्याचा उपयोग होतो. बंकिमबाबूनीं मिळतील तीं पुस्तकें वाचून काढण्याचा सपाटा सुरू केला. यामुळें त्याच्या वाचनात सर्व विषय येऊन गेले होते. ते जें कांहीं वाचीत तें मनन पूर्वक वाचीत असल्यानें त्याना तें सर्व विषय समजून चुकत.

---

## प्रकरण ५ वें.

—:*:—

# परिक्षा व नोकरी.

बंकिमबाबूंची ही वाङमय चोरी फार दिवस लपली नाहीं. वाचतांना कोणी पाहिलें नाहीं तरी सहज बोलण्यांतसुद्धां हें दिसून येत असे. खरा प्रकार लवकरच बाहेर पडला. शिक्षकांचें आश्चर्यास सीमा राहिली नाहीं. असा विद्वान्, चलाख विद्यार्थी आम्ही आजपर्यंत पाहिला नाहीं अशी त्यानीं स्पष्ट कबूली दिली. दिवसभर बंकिमबाबू वाचनात गढलेले असावयाचे, सध्याकाळचे वेळीं कांहीं वेळ एकटेच एखाद्या बागेंत किंवा गंगातीरीं फिरावयास जात असत. अशा तऱ्हेनें त्यानीं अभ्यास केला. विशेष आश्चर्य वाटण्याचें कारण त्यांचें अल्प वय होय. या वयांत एखादा विषय समजाऊन सांगितला तरी तो समजण्यास कठीण होत असतो अशा वयांत त्यांनीं वेगवेगळ्या विषयांवरील ग्रंथ वाचून ज्ञान संपादन करणें ही गोष्ट सामान्य कशी होईल ! याबद्दल आश्चर्य तरी कां वाटू नये ?

हल्लींप्रमाणें त्यावेळीं बी. ए., एल्. एल्. बी; एम. ए. वगैरे परिक्षा नव्हत्या. केवळ जुनिअर व सिनिअर एवढेंच काय ते भेद होते. बाकी

या परीक्षा कांहीं सोप्या होत्या असातला भाग नाहीं. ही परीक्षा अत्यंत कठीण आहे असेंच प्रत्यक्ष अनुभव घेतलेले लोक म्हणत होते. कॉलेज मधली अभ्यासाची सर्व पुस्तके तोंडपाठ केल्याशिवाय भागतच नसे. बंकिमबाबूंनीं कांहींच पाठ केले नव्हते. तरी पण थोड्याशा मुद-तींत त्यानीं पुस्तकें पाहून परीक्षा दिली एवढ्यानें त्याना त्या परिक्षेंत उत्तम प्रकारचें यश तर आलेंच परंतु त्यांचा नंबर वरती आलेला पाहून लोकाच्या आश्चर्यांत भरच पडली.

आपल्या मुलाचा अभ्यास संपल्याशिवाय त्याचा विवाह करावयाचा नाही असा यादवचंद्राचा विचार होता. बंकिमबाबूंची कीर्ति आतां-पर्यंत बरीच पसरली होती, परंतु परिक्षेनंतर तर ही बातमी चोंहींकडे झाली. आपल्या मुलीस असा वर मिळावा अशी इच्छा सहज असणा-रच. अशा तऱ्हेनें यश संपादन करणारा मुलगा सर्व बंगला प्रांतांतही नव्हता. यामुळे अनेक मुलींचे बाप यादवचंद्राकडे येऊन त्याना भाड घालू लागले. यादवचंद्रानीं आतांपर्यंत कशी तरी वेळ मारून नेली होती. परंतु आतां त्याना कांहींच सबब राहिली नव्हती. अखेर बंकिम-बाबूंच्या वयाच्या अकराव्या वर्षीं विवाह करणेंच भाग पडलें होतें. हें ग्नी सौख्य त्याना फार दिवस लाभलें नाहीं. आठ, नऊ वर्षांनीं त्यांची पहिली पत्नी वारली. त्याचा द्वितीय विवाह झाला.

हुगळी कॉलेजांत असतां बंकिमबाबूंचें संस्कृत थोडेंबहुत झालें होतें, परंतु तेवढ्यानें त्याची तृप्ती झाली नाहीं. कॉलेजचा अभ्यास झाल्या-वर गावीं मिळालेल्या वेळात त्यांनीं संस्कृतचा अभ्यास वाढविण्यास सुर-वात केली. लगेंच विषय ग्रहण करण्याची त्यांची हातोटी असल्यानें याही अभ्यासास फारसा काळ लागला नाहीं. केवळ संस्कृताचा अभ्यास करू-नच ते थांबले नाहींत, तर त्यानीं त्यांतले ग्रंथही वाहिले. संस्कृत-बामहया

थोडें नसल्यानें यास कांहीं दिवस लागणारच. संस्कृत भाषेंतील साहित्य उच्च दर्जाचें, काव्यकल्पना रमणीय असल्यानें त्यांना त्याची गोडीही वाटूं लागली.

बंगाल्यांत त्यावेळीं 'कविवर ईश्वरचंद्र गुप्त' याचें नांव प्रसिद्ध होतें. ईश्वरचंद्राचे लेख वाचण्याची गोडी लोकांना फार लागली होती. बंगाली भाषेंत वर्तमानपत्र काढून लोकांना आपले विचार कळविण्याची तऱ्हा त्यावेळीं नुकतीच सुरू झाली होती. ही पद्धत पूर्वी आपल्या हिंदुस्थानांत नव्हती परंतु इंग्रज लोकांनीं ज्या कांहीं सुधारणा इकडे आणल्या त्यांतलीच ही एक सुधारणा होती. ही पद्धत पंडित ईश्वरचंद्र यांनीं प्रथमच सुरू केली होती. कोणतीही पद्धत नवीन असली म्हणजे लोक प्रथम थोडे बिचकतात मग पुढें मात्र ही गोष्ट त्यांच्या अंगवळणीं पडते. पंडित ईश्वरचंद्र त्यावेळीं 'संवाद प्रभाकर' व साधुरंजन नामक दोन वर्तमानपत्रें काढीत होतें. या दोन्ही पत्रांत दीनबंधु मित्र व द्वारकानाथ अधिकारी हे आपल्या कविता प्रसिद्ध करीत असत. या दोघांशीं बंकिमबाबूंची प्रथम कांहीं ओळख नव्हती कारण दीनबंधु हे कलकत्त्यास हिंदु कॉलेजमध्यें व द्वारकानाथ चंद्रनगर कॉलेजमध्यें अभ्यास करीत होते.

आपल्या या हिंदुस्थानांतील कोणत्याही भाषेचा इतिहास पाहिला व त्याची वर्गवारी केली तर ब्रिटिश राजसत्तेनंतरचा एक भाग हा पडतोच. ब्रिटिशराजसत्तेबरोबर आपल्या भाषेवरही प्रभाव पडलेला आढळतो. आपल्या मराठी भाषेचा इतिहास जसा आहे तशीच स्थिती थोड्या फार फरकानें इतर भाषेचीही आहे. ब्रिटिश राज्यसत्तेनंतर हिंदुस्थानांतल्या प्रत्येक भाषेस कडक प्रकारचें वळण लागून त्याप्रमाणें वाङ्मय बाहेर पडूं लागलें. तेव्हांपासून आतापर्यंतच्या काळांत पोटभेद

घातले जातात. वाङ्मय सेवकांच्या कर्तबगारीवर हा काल ठरण्याची वहिवाट आहे. ज्यांनीं भाषेचा ओघ बदलला किंवा त्यात योग्य ते फेरफार केले त्या कालास ते त्यांचेंच नाव दिले पाहिजे. भाषेचा इतिहास असाच तऱ्हेनें लिहिला व पाहिला पाहिजे. या प्रमाणें पाहिल्यास यावेळीं बंगाली भाषेस ईश्वरचंद्राचा काळ असेंच नांव द्यावें लागेल. त्यावेळीं सगळेंच काहीं नवीन होतें. बहुतेक वाङ्मय संस्कृत भाषेंत असल्यानें त्याचा फायदा फार थोड्या लोकांस घेता येत असे. संस्कृत भाषेचा व्यवहारात उपयोग नसल्यानें केवळ ज्ञानाकरिता संस्कृत शिकणारे थोडेच निघत असत. या कालास भाषेचा बाल्यकाल असें नांव द्यावयाससुद्धा हरकत नाहीं हल्लींच्या भाषेचा विचार केल्यास हें नांव अगदीं बरोबर आहे असेंच म्हणतां येईल.

बालबंधुनो ! आमचे चरित्रनायक बंकिमबाबू काहीं केवळ शिकून नोकर होऊनच राहिले नाहींत. बुद्धिमान विद्यार्थी, चांगला नोकर एवढी त्यांची कीर्ति नसून ते पहिल्या प्रतीचे वाङ्मय भक्त होते. त्यांनीं श्री सरस्वतीची सेवा फारच उत्तम तऱ्हेने करून बंगाली भाषेच्या इतिहासात आपलें नाव अजरामर करून ठेविलें आहे. बंगाली भाषेच्या इतिहासात ' बंकिमकाल ' हा लिहिला गेलाच पाहिजे. बंगाली वाङ्मयास हल्लीं जें काहीं स्वरूप प्राप्त झाले आहे त्याचे जनकत्व बंकिमबाबूकडे आहे. त्यांचे नाव माहीत नाहीं असा मनुष्य सर्व बंगाल्यांत सांपडणार नाहीं. म्हणून तर आम्ही त्यांचें हें चरित्र तुमच्यापुढें ठेवीत आहोंत. तेव्हां ओघानें सर्व स्थिती सांगणेंच भाग पडते.

कोणतीही गोष्ट नवीन सुरू केल्यावर लोकांत एक प्रकारची खळबळ सुरू होत असते. ही खळबळ वेगवेगळ्या स्वरूपानीं दिसून येत असते. बंगाली भाषेंत वर्तमानपत्रें निघून कविता प्रसिद्ध होऊं लागल्याबरोबर कवींची चढाओढ सुरूं झाली. एकानें एक कविताप्रसिद्ध केली कीं,

त्यावर दुसऱ्यानें टीकेची कविता करून प्रसिद्ध करावी. अशा तऱ्हेनें चढाओढीची शर्यत सुरू झाली. नवीन लेखकास ईश्वरचंद्र लिहिण्याचा मार्ग दाखवीत असल्यानें त्यांना ' गुरू ' असेच सर्व लेखक मानीत असत. यात आमचे बंकिमबाबूही चढले. स्वतः प्रयत्न करून ते लेख लिहिण्यास शिकले. कांहीं कविता करून त्यांनीं त्या गुरु यांच्या वर्तमान-पत्रांत प्रसिद्धीस पाठविल्या. त्यांची पहिली कविता प्रसिद्ध झाल्याबरोबर-त्यांना फार आनंद झाला. ते जास्त उत्साहानें, नेटानें हा प्रयत्न करू-लागले. लेखकांचें युद्धांत त्यांनींही भाग घेतला.

हें काव्ययुद्ध थोडे दिवस चालले होते. पहिल्याप्रथमच कांहीं बंकिम-बाबूस यश आलें असें नाहीं. परंतु त्यांनीं चिकाटी कांहीं सोडिली नाहीं. नेटानें ते सारखे फिरफिरून प्रयत्न करीत राहिले. लेखनाकरितां त्यांनीं आपलें वाचन वाढविलें. काव्यग्रंथाचा अभ्यास केला. दीनबंधु व द्वारकानाथ हे ईश्वरचंद्राच्या पद्धतीप्रमाणें लिहीत असत परंतु बंकिम-बाबू कांहीं तसें लिहीत नसत. ते आपल्या विचाराप्रमाणें कविता करीत. त्यांची ती पद्धत पाहून ईश्वरचंद्रांनीं त्यांना ओळखिलें. हा मनुष्य पुढें चांगला साहित्यसेवक निपजेल असें त्यांनीं लगेच भविष्य वर्तवून ठेविलें. ईश्वरचंद्रांनीं बंकिमबाबूस शिक्षण देण्यास सुरवात केली. चुका कोठें होतात, कशा होतात व त्या कशा टाळाव्या, इत्यादि गोष्टी सांगितल्यानें बंकिमबाबूंची भरभराट उत्तरोत्तर जास्तच झाली. वयाच्या पंधराव्या सोळाव्या वर्षी बंकिमबाबूंनीं ' ललिता व मानस ' नामक काव्य लिहून तें छापून प्रसिद्ध केलें. तें काव्य फारच उत्कृष्ट वठलें होतें. एवढ्या वयात अशा प्रकारचें काव्य निर्माण करणें हें कांहीं सामान्य काम नव्हतें. तरीसुद्धा ईश्वरचंद्रास वाटलें कीं बंकिमबाबूंनीं पद्य न घेतां गद्य घेतल्यास फार चांगलें होईल. लगेच ईश्वरचंद्रांनीं ही सूचना

बंकिमबाबूंस केली, त्यांना ती मान्य झाली. बंकिमबाबूंनीं गद्य लेख लिहिण्यास सुरवात केली. पधरा, सोळावें वर्ष म्हणजे शाळेंत शिकण्याचें वय. परंतु या वयांत त्यांनीं सर्व विषयांवर लेख लिहिण्यास सुरवात केली. या कामीं सतत उद्योग दीर्घ परिश्रम, विलक्षण चिकाटी, अपूर्व उत्साह यांची जरूरी फार होती. ती त्याचें अंगीं होती म्हणून तर त्याची कीर्ति अजरामर होऊन राहिली आहे.

मरावें परी कीर्तिरूपें उरावें ! '

या श्रीसमर्थांच्या म्हणण्याप्रमाणें ते अजरामर झाले आहेत.

कॉलेजमधले शिक्षण पुरें झाल्यावर बंकिमबाबूंनीं ' सिनिअर स्कॉलर-शिप ' ही परीक्षा देऊन ते कॉलेजांतून बाहेर पडले. त्यांनीं याही परीक्षेंत चांगलें यश संपादन केलं होतें. आता फक्त कायद्याचा अभ्यास तेवढा बाकी राहिला होता. बाकीचे त्यावेळचे शिक्षण त्यानीं फार लवकर टाकिलं होतें. कायद्याचा अभ्यास करणें त्यावेळीं काहीं सोपें नव्हतें. फक्त कलकत्यास प्रेसिडेन्सी कॉलेज ' मध्येंच ' कायदा ' शिकविला जात असे. उरलेला कायदासुद्धां ठेवावयाचा नाहीं म्हणून त्यांनीं वयाच्या बतराव्या वर्षी प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें प्रवेश केला. अभ्यास सुरवात करून कित्येक महिने होतात न होतात तोंच एक नवीनच भानगड सुरू झाली. त्याचवेळीं बी. ए. ची परीक्षा नवीन सुरू झाली. या नवीन परीक्षेकडे सहजच लोकांचें लक्ष वेधिलें. बंकिमबाबूंनीं कायद्याचा अभ्यास सोडून देऊन बी. ए. च्या परीक्षेच्या अभ्यासास सुरवात केली. त्यावेळीं त्याचें वय केवळ वीस वर्षांचें होतें. बी. ए. च्या परीक्षेस केवळ दोनच महिने अवकाश होता. परंतु त्यांची इच्छा इतकी प्रबळ झाली होती कीं त्यांनीं कोणत्याही संकटास जुमानिलें नाहीं. हा अभ्यास त्यांनी कसा केला असेल याची कल्पनाच आमच्या वाल्मिकांनीं करावी.

बी. ए. सारखा नवीन परीक्षेचा अभ्यास वीस वर्षाच्या मुलानें केवळ दोन महिन्यांत करावयाचा म्हटल्यास त्याला काय काय करावयास पाहिजे हें आमच्या वाचकांनींच ठरवावें. परीक्षा संपल्यावर निकाल लागला. तेव्हां तर आश्चर्यांत भरच पडली. बंकिमबाबू अगदीं वरच्या नंबरांत पास. त्यांचे बरोबरच यदुनाथ बसू नामक एक बंगाली गृहस्थ पास झाले. " बंगाल्यांतील पहिले बी. ए. हेच होत. "

त्यावेळीं बंगालचे गव्हर्नर ह्यालिडेसाहेब होते. यांचे कानावर बंकिमबाबूंची कीर्ति गेली. सर्व हकिकत ऐकून त्यांना आश्चर्य तर वाटलच परंतु त्याबरोबर आनंदही झाला. लगेच लाटसाहेबानीं बंकिमबाबूंस डेप्युटी म्याजिस्ट्रेट ' करून त्यांच्या गुणाचा गौरव केला.

हल्लीं राज्यकारभारांत आपल्या हिंदुलोकांचा हात बराच आहे परंतु ती वेळ तशी नव्हती. मोठ्या नोकऱ्या हिंदुलोकांना त्यावेळीं मिळतच नसत; यामुळें डेप्युटी माजिस्ट्रेट ही पदवी अतिशय गौरवाची मानली जाणें अगदीं साहजिक आहे. या वेळचा इतिहास पाहिला तर धामधुमीचा होता. १८५७।५८ साल म्हणजे शिपायाचें बंड होय. देशांत एक प्रकारचे क्रांतिकारक विचाराचे वारे खेळत होते. बंडखोरानीं बंड केलें खरें परंतु बाकीच्या भुरट्या लोकानीं दरवडे, चोरी, खून करावयास सुरवात केली. राज्यव्यवस्था लागत असतांच ही आपत्ति ओढवली होती. यावेळीं बंकिमबाबूंस वरील मान मिळून त्यांची नेमणूक यशोरास झाली. येथून त्याच्या चरित्राचे नवीन भागास सुरवात झाली.

मराठी ग्रंथ सं... नं.... ता.... 

## प्रकरण ६ वें.

—:*:—

# कार्यतत्परता !

मानवी आयुष्याचे मुख्यतः तीन भाग करितां येतील. बालपण, तरूणपण व म्हातारपण. या तिन्ही अवस्था सर्वांस माहीतच आहेत. प्रत्येक अवस्थेतील कर्तव्यकर्महीं आखलेलें आहे. बालपणाचा काळ वयाच्या सोळा वर्षापर्यंत धरावयास हरकत नाहीं. यांत विद्याभ्यास करणें हेंच कर्तव्य असतें. यावेळीं होईल तितकें ज्ञान मिळविलें पाहिजे. या ज्ञानाच्या शिदोरीवरच सर्व जन्म जावयाचा आहे ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं. बालपण संपल्यावर तरूणपण. यांत मुख्यतः संसार, हा असून त्याकरितां नोकरी, धंदा करावा लागतो. समाजसेवा, देशसेवा वगैरे परोपकाराचीं कामें याच स्थितींत होत असतात. म्हातारपणीं शक्ति कमी येत असल्यानें केवळ तोंडाची टकळी सुरु असते. तरूणपणीं बरें-वाईट अनुभव येऊन म्हातारपणीं ज्ञानास एक प्रकारचें वेगळेंच स्वरूप येत असतें. परंतु हातून कृति घडत नसल्यानें म्हाताऱ्याच्या शब्दास किंमत रहात नाहीं. या अनुभवजन्यज्ञानास तारूण्यपणाच्या धडाडीचें सहाय्य मिळाल्यास खरोखर फार चांगलें होईल. परंतु तरूणास पुढील पोच नसल्यानें व अनुभव नसल्यानें एकदम उडी घ्यावी असें वाटतें व म्हातारा मनुष्य नेहमीं अस्ते कदम म्हणत असतो. यामुळेंच 'म्हाताऱ्याची कटकट' असें वाटूं लागतें.

आमच्या बंकिमबाबूंच्या आयुष्य नाटकाच्या दुसऱ्या अंकास सुरवात झाली. परीक्षा पास होऊन नोकरी लागली. दुसरा विवाह झालाच होता.

बाबू यशोरास येऊन दाखल झाले. येथें दीनबंधूचा व त्यांचा परिचय झाला. दीनबंधू हे नाटककार म्हणून प्रसिद्ध होते. दोघांचींही नावें वाङ्मय क्षेत्रांत चमकत असल्यानें प्रत्येकजण गांठ नसताही परस्परांची योग्यता जाणून होता. समक्ष भेट झाल्यानें त्यांचा स्नेह चांगलाच जमला.

एकवीस वर्षांचा पोर डेप्युटी माजिस्ट्रेट होऊन न्यायासनावर बसून कसला न्याय करणार ? असेंच प्रथम लोक म्हणू लागले. त्या... तेजस्वी शहांच पण हल्लींसुद्धां ही भावना दिसून येते. ज्ञान वयावर नसतें ही गोष्ट अद्यापपर्यंत लोकांस पटली नाहीं. यामुळें बंकिमबाबूंस आरंभीं त्रास पडला. आपल्या म्हणण्याप्रमाणें कामें होण्यास लोकांवर दाब असावा लागतो. हळुहळू थोडेच दिवसांत ही स्थिती बदलली गेली. न्यायासनावर बसल्यावर कोणत्याही गोष्टीबद्दल योग्य तोच न्याय करावयाचा. कोणाची भीडभाड ठेवावयाची नाहीं. यामुळें त्यांचा दाब सहजच लोकांवर बसू लागला. ज्ञानाचें तेज असेंच काहीं और आहे. त्या तेजापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. याचा अनुभव सर्वत्रांस येत असतोच.

डेप्युटी माजिस्ट्रेटचें काम म्हणजे काहीं सामान्य नव्हे. कसें तरी चार खडे घांसले किंवा अधिकारी म्हणून सह्या केल्या कीं, काम भागलें असें हें काम नव्हे. एका जिल्ह्याची सर्व व्यवस्था त्यावर असते... मुख्य कलेक्टर जरी जिल्ह्यास असला तरी त्याची बहुतेक जबाबदारी डेप्युटी कलेक्टरावर असतेंच. वादविवादाचे प्रश्न कायद्याप्रमाणें बरोबर सोडविले गेले पाहिजेत. हल्लींप्रमाणें त्यावेळीं राज्यव्यवस्था सुयंत्र चालत नव्हती. कायद्याचा प्रश्न बरोबर सुटला नव्हता. अशा वेळीं काम करणें फार जोखमीचें होतें, परंतु तसलेंही काम एकवीस वर्षांच्या बंकिमबाबूंनीं उत्कृष्ट प्रकारें करून दाखविलें. तो काल दंगेखोरांचा असल्यानें चोंहीकडे धुमाकूळ सुरू होता. हें काम बंकिमबाबूंनीं उत्कृष्ट प्रकारें बजाविलें. दंगे-

खोराना पकडून त्याना योग्य त्या शिक्षा केल्या यामुळें त्याचा चांगलाच दरारा बसला.

येथे असताना त्याची पत्नी वारली ही गोष्ट त्यांच्या मनास फार लागली यामुळें यशोरास रहावें असें त्याना मुळींच वाटेना, इतक्यात सुदैवाने त्यांची तेथून बदली झाली. त्यावेळीं फक्त यशोरासच खून, दरवडे पडत असें नाहीं. हे वारे बहुतेक बंगालप्रांतभर पसरलें होतें. बहुतेक प्रांतांत कमी अधिक प्रमाणानें दंगेधोपे आढळून येत होते. याचा विचार करून हे दंगेधोपे नाहींसे करणें सरकारचें कर्तव्य होतें. या कामाकरिता कोणी तरी चांगला हुषार मनुष्य सरकारला हवा होता. यशोरास बंकिमबाबूंनीं ही कामगिरी चांगल्या प्रकारें बजाविली होती ही गोष्ट सरकारचे कानावर होतीच. डोंगर, नदी वगैरे लपण्याचे ठिकाणीं या दंगेखोर लोकांना चांगले फावत असत. अशा ठिकाणीं कर्तव्यतत्पर नोकर नेमल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें अशा दंगखोर लोकांचा बंकिमबाबू फार कडक विचार करीत असत. अशा लोकांचे हातून पुन्हा असलीं कृत्यें घडू नयेत व दुसऱ्यानीं करू नयेत म्हणून असा कडकपणा धरणेंच भाग होत. यावेळीं खाथीं येथे फारच बंडाळी माजली होती म्हणून सरकारान त्याची तेथ नेमणूक केली

याच वेळीं त्याचा पुन्हां विवाह झाला. येथेंही त्याचा वचक चांगला बसला. कोणतेंही काम हातीं घेतल्यानंतर तं ढचगत्र न करितां करीत असत. अभ्यासाची चिकाटी इतर कामांतही दिसून येत होती. एकदां एखादें काम हातीं घेतल्यावर तें सोडावयाचें नाहीं हा त्याचा गुण घेण्यासारखा होता. एखादें काम हातीं घेतलें म्हणजे त्याला अडथळे हे येणारच. अडचणी आल्या म्हणून हातांतलें काम सोडून देणें हे नामर्द-पणाचें काम होय. आलेल्या अडचणींना, संकटाना तोंड देऊन काम

करण्यातच महत्त्व असतें. कोणत्याही थोर पुरुषाचें चरित्र तुम्हीं घेऊन पहा तेथें या दोन गोष्टी प्रामुख्यानेंच आढळून येतील.

या दगे खोरांनीं लोकांस अतिशय छळलें होतें. घरात पैसा अडका, भांडीकुंडी, वस्त्रें राहिनात. कोणत्या वेळीं कोणावर गदा येईल याचा कांहीं नियम नव्हता. परगांवीं जाण्याचें तर राहोच परंतु घरांत सुद्धा रहातां येत नव्हते. पैशाकरितां दरवडेखोर आपला केव्हां प्राण घेतील याचा कांहीं नियम लागत नव्हता. यामुळे काहीं लोक आपलीं घरेंदारें सोडून दुसरीकडे निघून गेले. अशीच स्थिती आणखी काहीं दिवस राहिली असती तर कांहीं प्रदेश ओसाड पडले असते. या दगेखोराचा वचक लोकावर फार बसला होता. त्यांच्या टोळयाही काहीं लहान सहान नव्हत्या. यांतच एखादा राजा सुद्धा बनत असे. आमची प्रजा आम्हाला वेळेवर कर देत नाहीं. म्हणून तो आम्हीं अशा तऱ्हेनें वसूल करितो आहोंत असें म्हणावयास सुद्धा ते लोक कचरत नसत. हे लोक केवळ चोऱ्याच करीत असें नाहीं तर खून सुद्धां करीत. एखाद्या गांवावर चालून जाऊन व हलकेसं युद्ध करून लूट मिळवीत. बंगालचा इतिहास पाहिला तर यावेळीं चोहींकडे अशीच धुडाई सुरू असलेली दिसून येईल. या धुडाईच्या अनेक गोष्टी बंगाल देशात ऐकावयास व वाचावयास मिळतात.

असाच जिल्हा बंकिमबाबूचे वाट्णीस आला होता. या दगेखोरास आळा घालणें काहीं सोपें काम नव्हतें. "जावें त्याचे वंशा तेव्हां कळे" असें श्री तुकाराम महाराज म्हणतात तेंच खरें. ही धुडाई नाहींशी करावयाचा बंकिमबाबूंनीं निश्चयच केला होता. अखेर "निश्चयाचें बळ। तुका म्हणे तेंची फळ॥" या म्हणण्याप्रमाणें घडलें. निश्चयपूर्वक, सतत उद्योगानें काम केल्यास यश हें येणारच. येथें आल्यावर बंकिमबाबूंनीं एक प्रांत साधारण व्यवस्था केली तोंच त्यांची तेथून खुल्न

जिल्ह्यास बदली झाली. याही जिल्ह्यास तोच त्रास असल्यानें तेथें त्याना प्रयत्न करावें लागलें. खुलना येथें तर या दरोखोरांचें बरेंच प्रस्थ होतें. या जिल्ह्यात 'मरेल' व 'हिली' या नांवाचें दोन दरवडेखोर सुप्रसिद्ध होते. त्यांनीं एके ठिकाणीं तर उघड वस्ती केली होती. त्याचे-जवळ लोक पुष्कळ असून हत्यारेंहीं होतीं. आतांपर्यंत या प्रकारास आळा घालता आला नाहीं. परंतु बंकिमबाबूंनीं दरोखोरावर करडी कमान धरिली. तेव्हा आता आपला कांहीं निभाव लागत नाहीं, अशी त्यांची खात्री होऊन चुकली. दरोखोरांच्या टोळीपैकीं बरेच लोक पकडले गेले. या लोकांस बंकिमबाबूंनीं चांगलें शासन केलें. या भयानें हे दोन दरवडेखोर आसामात पळून गेले. मुख्य सरदार पळून गेल्यानें इतर लोकांनीं हातपाय गाळले. हे दोन इसम मोकळे ठेवून उपयोग नाहीं, कदाचित् ते पुन्हां परत आल्यास पुन्हां असाच प्रकार होईल म्हणून त्यांचा पाठलाग करून आणून त्याना योग्य शासन केलें. तेव्हां मात्र दरोखोरांचें पोटात धस्स झालें व इतर लोकास थोडेंबहुत हायसें वाटलें.

गंगानदी समुद्रास मिळाली आहे, तेथें अनेक मुखांनीं ती मिळाली आहे. या मुखामध्यें जो प्रदेश आहे त्याला 'सुंदरवन' असें नाव आहे. मोठें अरण्य, व झाडीं असल्यानें तेथें दरवडेखोराच्या टोळ्या लपत असत. हें ठिकाण सरकारचे नजरेस आल्यानें त्याला वेढा घालून लोक भराभर पकडून तुरुंगांत पाठविले जात होतें. त्यांतूनही कित्येक लोक पळून गेले, ते कायमचेच. अशा प्रकारे पुंडाईचा बंदोबस्त होऊन देशांत शांतता केली.

या कामीं बंकिमबाबूंनीं फार श्रम घेतले होते. ही गोष्ट सरकाराचे दृष्टी पुढें होती. कर्तव्यतत्पर बंकिमबाबू स्वकार्य करण्यांतच धन्यता मानीत असत. त्याची या कामाबद्दल सरकारांनीं त्यांची वाहवा केली. त्यांचा मानमरातब चांगला वाढविला.

## प्रकरण ७ वें.

—:*:—

# वाङ्मय-सेवा.

प्रिय वाचक बंधूनो ! आतांपर्यंत तुम्हीं बंकिमबाबूंची नोकरी पाहिली व कार्यतत्परताही वाचिली आता आपण त्यांची वाङ्मयसेवा पाहू या वाङ्मय कशाला म्हणावें, तें कोणतें असावें, त्यात भेद कोणते आहेत इत्यादि नीरस गोष्टी आपण सोडून देऊन फक्त सरळपणें पाहू या. आपले विचार आपण कागदावर लिहून किंवा छापून जी आपण आपल्या जन्मभाषेची सेवा करितों त्याला वाङ्मयसेवा म्हणावयास हरकत नाहीं. आपण जरी हा सोपा, सरळ अर्थ केला तरी कांहीं र ट प लिहून ही सेवा होईल असें कोणी समजू नये. नाहींतर तुम्ही आपल्या खर्ड्यासच वाङ्मय म्हणू लागाल, किंवा एखादी काऊची गोष्ट लिहून तुम्हीं साहित्यरथी व्हाल. वाङ्मय व साहित्य हें नांव मिळण्यास विचारही तशाच दर्जाचे असावयास पाहिजे आहेत. थोड-क्यांत पुष्कळसा अर्थ निघेल, लोकांना एखादा विषय समजावून सांगितला असेल अशाच पुस्तकास, ग्रथास वाङ्मय किंवा साहित्य असें म्हणतात. यातही पोटभेद आहेत, अनेक प्रकार आहेत. परंतु तूर्त आप-ल्याला इतक्या खोलांत शिरावयाचें कांहीं कारण नाहीं.

आमचे बंकिमबाबू कांहीं केवळ सरकारी नोकरी किंवा मानमरातब, पदव्या यावर पुढें आलेले नाहींत, कर्तव्यतत्पर असें अनेक नोकर होऊन गेले असतील, हल्लीं असतील व पुढेंही होतील, अशा नोकरांची चरित्रें सर्वांस सर्वस्वी मार्गदर्शक होतील असें कांहीं म्हणता यावयाचें नाहीं. निदान आम्हीं तरी तसें समजत नाही एवढें खरें. बंकिमबाबूंची

जी कीर्ति झाली आहे ती सरकारी बडे नोकर म्हणून नसून वाङ्मय-सेवक म्हणून आहे. ही गोष्ट मुख्यत. आमच्या वाचकबंधूनीं [illegible] स्मरणात ठेवावी. त्या वाङ्मयसेवकाचें चरित्र म्हणूनच आम्ही ते लिहित आहोंत त्याबरोबरच त्याच्या आयुष्यातील मुख्य मुख्य गोष्टी आपणास पाहिल्या पाहिजेत म्हणूनच त्या दिल्या आहेत व देणार आहोंत.

वयाच्या पधराव्या, सोळाव्या वर्षांच बंकिमबाबूनीं वाङ्मयसेवेस सुरवात केली होती. त्याचे पहिलें काव्य बाहेर पडलेंच होतें. त्याचा ओढा वाङ्मयसेवेकडे फार होता. सरकारी नोकरी सोडल्यावरसुद्धा ते वाङमय-सेवा करीत राहिले होते. म्हणूनच त्याचा मुख्य विषय तो असून सरकारी नोकरी ही केवळ विर्वाहाचें साधन म्हणूनच तें करीत होतें असें म्हणावयास कांहींसुद्धा भीति नाहीं. त्याचें चरित्र नीट पाहिल्यास ही गोष्ट सहज पटण्यासारखे आहे. मध्यतरीं नोकरीची दगदग फार पडली. कर्तव्य म्हणून त्याना हें काम करावें लागले. यामुळें सहजच त्यांना वाङमय सेवेकडे लक्ष देण्यास सवड झाली नाहीं. कामाचा बोजा कांहींसा कमी होऊन शांतता मिळाल्यावर त्यानीं पुन्हा लेखनास सुरवात केली.

बंकिमबाबूनीं काव्यें करण्यासच प्रथम सुरवात केली होती परंतु ईश्वरचंद्रानीं पद्यापेक्षा गद्यच लिहिण्यास शिफारस केल्यानें त्यानीं तोच मार्ग स्विकारला. खुलन्याहून त्याची बदली चोवीस परगण्यास झाली. तेथें काहीं सारखें काम नसल्यानें सरकारी नोकरींतून मिळणारा वेळ वाङमयसेवेकडे खर्चा घालू लागले. वयाच्या २५।२६ वर्षीं त्यानीं ' दुर्गेश नंदिनी नामक एक कादंबरी प्रसिद्ध केली याचवेळीं त्याचे आयुष्यात एक महत्वाची गोष्ट घडून आली. सरकारी नोकराचे हुद्दे ठरविण्याकरिता एक कमिटी नेमिली गेली असून प्रिन्सेपसाहेब तिचे अध्यक्ष होते. या साहेबास काहीं कामानिमित्त रजा घ्यावी लागली. त्या मुदतींत

हें काम बंकिमबाबूकडे सरकारानीं सोंपविलें. हल्लीं याचें महत्व फारसें नाहीं खरें परंतु अशा कमिटींत हिंदुलोकांचा शिरकाव होणें-सुद्धां त्याकाळीं कठीण होतें. मग त्या कमिटीचें अध्यक्ष होण्याचा मान सामान्य कसा असू शकेल ? हा मान फारच मोठा आहे असें त्यावेळीं मानलें जात असे. या योगानें त्यांच्या पूर्व कीर्तींत ही एक भरच पडली.

हें काम थोडे दिवसाचें होतें तें संपल्यावर त्यांना डेप्युटी माजिस्ट्रेट म्हणून बहरमपूर येथें यावें लागलें. येथून मालदह व हुगळी येथें लवकरच बदल्या झाल्या. बदलीचा त्रास कांहीं कमी नसतो. या मुदतींतसुद्धां बंकिमबाबूनीं आपल्या लेखणीस विश्रांति दिली नाहीं. हजारो कामें असोत, कांहीं अडचणी असोत ते कांहींना कांहीं तरी लिहीत असत. यानंतर त्यानीं ' कपाल कुंडला ' व ' मृणालिनी ' या दोन कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या.

या वेळची स्थिती नीट पाहिली पाहिजे. आपल्या या हिंदुस्थान देशांत यापूर्वीं जें वाङमय झालें होतें तें सर्व संस्कृत भाषेतच झालें होतें. हिंदुस्थानच्या बहुतेक प्रांतांतील वाङ्मय संस्कृत भाषेतच लिहिलेलें आढळतें. ज्या भाषा संस्कृतापासून उत्पन्न झाल्या आहेत त्यांचें वाङ्मय संस्कृत भाषेंतच दिसून येत. बोलण्या चालण्यास साधी भाषा व वाङमयास संस्कृत भाषा असाच यांचा क्रम होता. ही स्थिती जशी मराठी भाषेची होती तशीच स्थिती बंगाली भाषेची होती. बोलावयाच्या भाषेस प्राकृत असें नांव मराठींत आहे. आपल्या मराठी भाषेंत पूर्व ग्रंथ नव्हते. कोणतेंही वाङमय संस्कृत भाषेंतच लिहिण्याची वहिवाट होती परंतु संस्कृत भाषा जाणणारे लोक कमी होऊं लागले. त्यामुळें सर्वांस त्या वाङमयाचा फायदा घेतां येईना म्हणून आपल्या इकडील ज्ञानेश्वर,

नामदेव तुकाराम, मोरोपंत वगैरे साधुवर्गांनीं प्राकृतांत ग्रंथ रचना करावयास सुरवात केली. ही गोष्ट संस्कृताभिमानी पंडितांस रूचली नाहीं. त्यांनीं त्याविरुद्ध बरीच ओरड केली. 'या लोकांनीं धर्म बुडविला, म्हणून हाकाटी सुरू केली. यामुळें तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या वह्या नदींत बुडविल्याची गोष्ट सांगतात. मोरोपंतासुद्धा असाच छळ सोसावा लागला असे त्यांच्या उद्गारावरून दिसतें. याबद्दल त्यांनीं आपल्या 'मंत्र रामायणांत,' बरेंच वर्णन केलें आहे. ज्ञानदेव, नामदेव व एकनाथ यांनाही हा त्रास झाला आहे. या सर्वांचा येथें उल्लेख करावयाचें कारण नाहीं. जमल्यास त्यांच्या चरित्रांत ही माहिती आमच्या वाचक वर्गास आम्हीं करून देऊं.

ही स्थिती जशी मराठीची झाली तशीच स्थिती बंगालीची होती. हा छळ सोसण्याचा मान मात्र बंकिमबाबूकडे आला. आतांपर्यंत तिकडे असा प्रयत्न कोणी फारसा केला नव्हता. आतापर्यंत चालत आलेली वहिवाट बंकिमबाबू मोडत आहेत असें पाहून शास्त्री, पंडीत लोक खवळून गेले. त्यांनीं वादास कमरा कसल्या. वाङ्मयांत एक प्रकारची ही क्रांतीच घडून आली असें म्हणावयास हरकत नव्हती. बंकिमबाबूंनीं चालत आलेली रूढी एकदम बदलून टाकली. याचवेळीं आणखी एक तऱ्हा होती. आतापर्यंत संस्कृत भाषेंतच ग्रंथ रचना होत होती. यानंतर इंग्लिश भाषेचा प्रसार झाला. इंग्लिश भाषेंत अनेक विषयावर पुष्कळ ग्रंथ संग्रह असलेला पाहून आपल्या हिंदुलोकांसही आपण ग्रंथरचना करावी, असें वाटूं लागलें. इच्छा कांही वावगी नव्हती. परंतु आरंभी ग्रंथ इंग्लिश भाषेतच होऊं लागले. यामुळें पूर्व स्थिती कायमच राहिली. संस्कृत शिकल्याशिवाय संस्कृत वाङ्मय पाहतां येत नसे, व इंग्लिश भाषेशिवाय त्यांतलें ज्ञान घेतां येत नसे. ती वेळच अशी कांहीं चमत्कारिक होती. पुराणप्रिय हिंदुलोक सुधारणेच्या भपक्यास भुलले. सुशिक्षित

लोक इंग्लिश भाषेशिवाय पाणी सुद्धा मागेनात. आपली जन्म भाषा वाईट म्हणून त्यांनीं त्याज्य ठरविली होती. जन्म भाषेंत बोलणें सुद्धा त्यांना अपमानकारक वाटत होते. मग इतर गोष्टी लांबच राहिल्या. स्वाभिमान कसा तो राहिलाच नव्हता. आपला देश आपली भाषा यांचा अभिमान त्यांना राहिला नसल्याने त्यांचे हातून वाङ्मय सेवा घडलीच नाही.

बंकिमबाबू सुशिक्षित होते, पदवीधर होते व इंग्लिश भाषेवर त्यांचें प्रभुत्वही चांगलेच होतें. आरंभीं त्यांनीं सुद्धा इंग्लिशमध्यच लिहिण्यास सुरुवात केली होती. परंतु त्यांची ही चूक त्यांना लवकरच कळून आली. इंग्लिश भाषा राजभाषा आहे, म्हणून ती आपण शिकलो. त्या भाषेंत ग्रंथसंग्रह फारच आहे, त्याचें ज्ञान प्राप्त करून घेणें हे आपलें कर्तव्य आहे. इंग्लिश भाषेंत ग्रंथ रचना करूं नये, असें काहीं नाहीं; परंतु आपल्या मातृभाषेंत एकसुद्धा ग्रंथ नसतांना, परकीय भाषेची भर घालीत आहोंत हें पाहून त्यांचा त्यांनाच खेद झाला. इंग्लिश भाषेंत ग्रंथसंग्रह फार आहे तिला काहीं इतकीशी जरूरी नाही. शिवाय त्या इंग्लिश भाषेच्या तोडीस आपली बंगाली भाषा बसविण्याचा आश्रय प्रथम बंकिमबाबूंनीं केला. हें धाडस काहीं सामान्य नव्हतें. कोणीकडे इंग्लिश भाषा व कोणीकडे बंगाली भाषा ! परंतु बंकिमबाबूंनीं या विषयावर लेख लिहून वाङ्मय सेवकास जागृत केलें. स्वभाषाभिमान धरा व तिच्या उन्नती करितां खटपट करूं या, म्हणून लेख लिहिले. यामुळें सुशिक्षित लोकांस एक प्रकारचें नवीन चैतन्य दिसून येऊं लागलें. वादविवादास एक नवीन कारण उपस्थित झालें.

एखादी नवीन कल्पना निघाली कीं ती लोकांस पटतेच असें काहीं नाहीं. बंकिमबाबूंनीं आपली बंगभाषा इंग्लिश भाषेच्या तोडीची करावयाचा निश्चय करून त्याप्रमाणें प्रयत्नास सुरवात केली खरी परंतु या

कामीं दोन मुख्यत. अडथळे येऊ लागले. पहिला अडथळा पुराणप्रिय शास्त्री, पंडित यांचा व दुसरा आधुनिक सुधारणाप्रिय सुशिक्षित लोकांचा. यांपैकीं पहिला वर्ग फारच प्रबळ होता. आतापर्यंत असें चालत आलें आहे हें रूढी शास्त्र घेऊन तो वर्ग बंकिमबाबूंवर चाल करून आला. बंकिमबाबूंनीं प्राकृतांत ग्रंथ रचना करून धर्म बुडविला, रूढी पायाखालीं तुडविली, अशा तऱ्हेनें हाकाटी सुरु केली. सुधारणाप्रिय सुशिक्षितांनीं हा गावढळ प्रयत्न आहे. इतका शिकलेला मनुष्य बंगाली भाषेंत काय लिहितो म्हणून हेटाळणी करण्यास सुरवात केली. या दोन्ही पक्षास बंकिमबाबूंनीं तोंड दिलें. हे दोन्ही वर्ग त्यांचेवर टीकास्त्राचे प्रखर वार करीत असतो ते सर्व सहन करून एऊन त्यांना बंकिमबाबूंनीं विनोदी भाषेंत फारच मार्मिक उत्तरें दिलीं आहेत. हे विनोदी लेख फारच चांगलें असून त्यांपैकीं कांहीं लेख कमलाकांत-रहस्य नामक एका स्वतंत्र पुस्तकांत घेतले आहेत. त्यावरून त्यांचा मार्मिकपणा दिसून येतो.

लहान मुलांना मनोरंजक गोष्टी आवडतात हें माहित आहेत. ही स्थिति जाणून बंकिमबाबूंनीं सुरवातीस मनोरंजक कादंबऱ्याच लिहिण्यास सुरवात केली होती. बंगाली भाषेचा तो बाल्यपणाचा काल होता. आपण एखाद्या अवघड विषयांवर भारदस्त लेख लिहिला तर तो लोकांच्या पचनीं पडणार नाहीं. वाचनानीं अभिरूचीं लोकांना लागणार नाहीं म्हणूनच त्यांनीं सुरवातीस तीन चार कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या. पण मनोरंजक कादंबऱ्यांनीं वाङ्मयांत विशेषशी भर पडणार नाहीं. कादंबऱ्या केवळ करमणुकीकरितां आहेत. करमणूक करून देत असतां एखादा विषय सांगता येईल एवढाच उपयोग कादंबऱ्यांपासून होऊं शकेल. विशेष ज्ञानाकरिता भारदस्त वाङ्मयाचीच जरूरी असते. रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, इत्यादि विषय मनोरंजक कादंबऱ्यांनीं कसे सांगवितां

येतील ? सर्व विषयावरील ग्रथांचीं भूषणें जेव्हां मातृभाषादेवीचें अंगावर चालवीं तेव्हाच शोभा येईल एखाद्या देवीचें गळ्यांत एकाच प्रकारचे अनेक अलकार घातले तर ते शोभा देणार नाहींत. निरनिराळ्या प्रकारचे अलकार निरनिराळ्या ठिकाणीं घालावेत तेव्हाच शोभा दिसेल. म्हणून बकिमबाबू इतर वाङ्मयाकडे वळले.

बकिमबाबूंची बुद्धी कांहीं एकाच विषयास वाहिलेली नव्हती. ते अष्टपैलू होते त्यांचें सर्व विषयावर वाचन जबरदस्त झालें असल्यानें त्यांना कांहीं नडलें नाहीं. हे प्रयत्न त्यांनीं कसकसें केलें तें पुढच्या प्रकरणात पाहूं.

---

## प्रकरण ८ वें.

# संपादक

आतांपर्यंत बकिमबाबूंनीं कांहीं किरकोळ लेख व पुस्तकें लिहून वाङ्मयसेवा बजाविली होती. परंतु एवढ्यानें त्याचें काम सुरळीत चालत नव्हतें. एखाद्या विषयांवर लोकजागृती करावयाची झाल्यास त्यांना दुसऱ्याच्या पत्राकडे धाव घ्यावी लागत असे. जीं कांहीं थोडीबहूत वर्तमानपत्रें व मासिकें होतीं तीं तरी सरळ कोठें चालत होतीं ! ज्याला जसें वाटेल जसें तो चालवित असे. यामुळें बकिमबाबूंना ही अडचण फार जाणवू लागली. एखाद्या पत्रांत एकाच विषयाचा उहापोह होत असे. पत्राच्या चालक मडळींतही जोम असावा लागतो, विद्वत्तेची जरूरी असतें; सर्व विषयात तारतम्यज्ञान लागत असतें. बकिमबाबूप्रमाणें सर्व विषयांत ज्ञानी असा मनुष्य असणें कठीणच असतें.

त्यावेळचीं सर्व पत्रें एककल्ली, एकमार्गीच असत. रूढीच्या वळाला ही मंडळी मदतच करीत असत. चालू रूढी विरुद्ध जाण्याची छाती त्याना एकदम होईना. 'जुनें तें सोनें' असा एका पक्षाचा हट्ट तर दुसरा 'जुनें तें टाकावू व नवें तें सोनें, अशा मताचा अभिमानी होता. ज्याप्रमाणे एखादी राज्यक्रांती होत असता चोहींकडे धुमाकूळ चालत असतो, त्याचप्रमाणें वाङ्मय क्रांतीचेवेळीं धामधूम माजणें साहजिक होतें. विचाराना निराळें वळण लावणें कांहीं सोपें काम नाहीं. या कामीं पुढाकार घेणारास कितीतरी त्रास भोगावा लागतो. सामाजिक सुधारणा, वाङ्मय सुधारणा, राजकीय सुधारणा घडवून आणणाऱ्या पुढाऱ्यांस काय काय त्रास भोगावा लागतो हें त्याचें चरित्र पाहिल्याशिवाय कळणार नाहीं. अशा तऱ्हेचा हा चरित्र परिचय करून घेतला पाहिजे.

एखादी अडचण पडली म्हणजे आपोआप मार्ग सुचतात. बंकिमबाबूना ही अडचण पडल्यावर त्याना मार्ग सुचला. त्यांनीं इसवी सन १८७२ सालीं वंगदर्शन नामक एक मासिक पुस्तक काढण्यास सुरवात केली. हल्लीं जिकडे पहावे तिकडे वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें दिसून येतात, यामुळें मासिक पुस्तक काढणें हें सोपें झालें आहे असें वाटतें. त्याचें महत्वही राहिलें नाहीं. मासिक पुस्तक काढणें हे काम कांहीं सोपें नाहीं. मासिक पुस्तक काढणाऱ्या संपादकावर किती जबाबदारी असते याची जाणीव फारच मोठ्या लोकाना हल्लींसुद्धा असेल असें म्हणावयास हरकत नाहीं, आपल्या या मराठी भाषेंत अनेक पत्रें निघतात, मासिकें जन्म घेतात व लवकरच विराम पावतात. वर्तमानपत्राचें संपादक फक्त पैशापुरता प्रश्न पाहतात व त्यामुळेंच त्याना आपले प्रयत्न चालविणें अशक्य होऊन जातें. वाङ्मयसेवा करणें म्हणजे पैसे मिळविणें नव्हे. म्हणूनच बंकिमबाबूंनीं सर्वांना उदाहरणादाखल हे मासिक चालविलें होतें.

बंगाली भाषेस चांगलें वळण लावण्याची अत्यंत जरूरी त्यावेळीं होती. ही जबाबदारी लेखक, संपादक व प्रकाशक यांचेवरच सर्वस्वी अवलंबून असणार. यांपैकीं प्रकाशक हा पैशाकरितांच प्रयत्न करणारा आढळून येतो. वाङ्मयसेवा करावी म्हणून तो कांहीं प्रयत्न करीत नसून केवळ दोन पैसे मिळावेत म्हणून तो धंदा करीत असतो. बाकीची सर्व जबाबदारी लेखकांवरच येऊन पडते. लेखक आपल्या मताप्रमाणेच लेखन लिहित असतो. यामुळें त्यांत एककल्लीपणा असण्याचाच संभव जास्त. हे दोष टाळावेत, भाषेला चांगलें वळण लागून वाङ्मय चांगलें निपजावें म्हणून संपादकीय जबाबदारी अंगावर घेऊन बंकिमबाबूंनीं मासिक पुस्तक सुरू केलें.

कोणत्याही राष्ट्राचा दर्जा कितपत आहे तें पाहण्याचीं जीं अनेक साधनें आहेत त्यांत वाङ्मय हें एक साधन आहे. ज्या प्रांताचें किंवा ज्या भाषेचें वाङ्मय भारदस्त असून चांगलें आहे तो प्रांत किंवा तो देश जीवंत आहे; उन्नति करून घेणारा आहे; सधन आहे हें ओळखतात. आपल्या या हिंदुस्थानदेशांत पूर्वींपासून अध्यात्म, वेदांत ज्ञानाचें वाङ्मय भरपूर आहे. तसें हल्लींसुद्धां कोणत्याही देशांत वाङ्मय नाहीं. म्हणूनच हिंदुस्थान हा अध्यात्म ज्ञानांत 'जगाचा गुरु' आहे असें मानतात. यावरूनच वाङ्मयाची महती कळून येईल. प्रत्येक मनुष्यास संगतीची जरूरी असते. जमावानें राहणें हा मानवधर्मच आहे. मनुष्यास कोणाबरोबर संगत करावीच लागते. चांगली संगत प्रत्येकास लाभणे शक्य नाहीं. वास्तव चांगल्या ग्रंथाचें वाचनांत वेळ घालविणें या सारखा दुसरा राजमार्ग नाहीं. ज्याला वाङ्मय असें म्हणता येईल त्या वाङ्मयाचें वाचनानें फायदाच होत असतो. तोटा कधीं होणार नसतो. माझ्या बालमित्रांनो! तुम्हीं ज्या कोणाची संगती धरली असेल ती चांगली आहे का हें पहा.

चांगली संगत नसल्यास सोडून द्या व ग्रंथाची संगत धरा. म्हणजे तुम्हांला ज्ञानाचा लाभ होईल, तुमचा काळ आनंदांत जाईल.

वंगदर्शन मासिकाचा जन्म झाल्याबरोबर चोहोंकडे खळबळ उडाली. बंगाली भाषेची उन्नति यापासूनच झाली आहे. वंगभाषा देवीचें अंगावर येथूनच नानातऱ्हेचें अलंकार झळकूं लागले. ज्या बंगाली भाषादेवतेच्या अंगावर एकसुद्धा ठळक जिन्नस नव्हता, त्यावेळीं या अलंकाराची काय किंमत झाली असेल ? बंकिमबाबूनें जें अलंकार या देवीच्या अंगावर चढविलें ते अद्यापपर्यंत तसेंच चमकत राहिले आहेत.

मासिक पुस्तक सुरू झाल्यावर अनेक भाषाभिमानी गृहस्थाकडून लेख येऊं लागले. त्यातले कित्येक लोक विद्वान होते खरें, परंतु आपला विषय लोकांना कसा समजावून सांगावा हे कांहीं कळत नाहीं. याबद्दल आश्चर्य करण्याचें कांहीं कारण नाहीं. याचा अनुभव घ्यावयाचा असल्यास तुम्हीं पाहिलेली एखादी गोष्ट लिहून काढा बरें. कितीतरी अंतर पडलेलें तुम्हाला आढळून येईल. लेखन ही एक कला आहे, ही कला साध्य करून घ्यावयास अभ्यासच केला पाहिजे. काव्यप्रतिभा किंवा लेखन-प्रतिभा ही जन्मतःच असावी लागते. अभ्यासानें कांहीं साध्य होऊं शकते. ही प्रतिभा बंकिमबाबूंचे ठिकाणीं उत्कृष्ठ प्रकारें दिसून येतें, त्यांचें ग्रंथ पाहिल्यावर याची प्रचिती येऊं लागतें. हल्लीं मासिक पुस्त-कांचें संपादक लेखाबद्दल फारसे जबाबदार नसतात. त्या लेखाबद्दल लेखक जबाबदार धरला जातो. परंतु आरंभीं ही स्थिती नव्हती. निदान हा नियम वंगदर्शनकारास तरी पसंत नव्हता. बंकिमचंद्र हे स्वतः आलेले सर्व लेख नीट वाचून पहात असत. लेखाची मांडणी विषयास धरून झाली आहे अगर नाहीं; विषय पद्धतशीर आहे अगर कसें, लोकांना तो कसा समजेल, भाषा कशी असावी; इत्यादि नानातऱ्हेनें त्यांना लेख

परीक्षण करावें लागे. लेखांत सुधारणा कराव्या लागत असत. एखादा मनुष्य एखाद्या विषयांत तज्ञ असू शकेल परंतु त्याला सर्वच गोष्टी समजत असतात असें मात्र म्हणतां येत नाहीं. सर्व विषय समजणारे अष्टपैलू लोक असामान्य कोटींतील गणले जातात. असें लोक फारच थोडे आढळून येतात. या थोड्या लोकांतच बंकिमबाबूंची गणना होती. ज्यावर त्यांनीं वाचन विचार केला नाहीं असा विषयच नव्हता. इतकी त्यांची बुद्धिमता होती. याच बुद्धिमत्तेचा त्यांनीं बंगदर्शन मासिकाकडे उपयोग केला. आलेला लेख पाहून त्यात योग्य त्या सुधारणा करून भाषाभांडारात भर घालीत होते. अशा तऱ्हेनें पद्धतशीरपणें प्रयत्न सुरू होते.

त्याच्या या प्रयत्नास यशही पण आले. आरंभी टीकेच्या भडीमारानें त्याना अगदीं सतावून सोडलें होतें परंतु बंकिमबाबूंनीं त्याला मुळींच दाद दिली नाहीं. बंगदर्शनांतील लेखांनीं चांगलीच खळबळ उडवून सोडली. पुढें बंकिमबाबू अमूक विषयावर काय म्हणतात याकडे लोकाचे लक्ष लागलें. अलौकिक बुद्धिमत्तेची छाप लोकावर बसू लागली. लोक सहजच त्याच्या म्हणण्यास मान देऊं लागले व पुढें तर ते सांगतील तें प्रमाण अशी स्थिति येऊन पोंचली.

सामाजिक बाब, धार्मिक बाब व राजकीय बाब याविषयीं लोकात त्यावेळीं एकप्रकारची लाटच उसळली होती. इंग्रज लोकापासून आमचे लोक सुधारणा शिकून फॅशनेबल बनले. या सुधारणेपुढें जगसुद्धा त्यांना तुच्छ वाटू लागलें. जुन्या मताचें लोक रूढी बळकट करूं लागलें. अशी कांहीं ओढाताण होऊं लागली; यावर बंकिमबाबूंनीं विनोदी भाषेंत फारच बहार करून सोडली आहे. त्यावेळीं राज्यव्यवस्था नीट लागली नसल्यानें नोकर लोक जाणून बुजून लांच घेत असत. याबद्दल

त्यांनीं या नोकर लोकांचे कान लांब करून लंबकर्ण बनविलें आहे. कित्येक दुष्ट चालीबद्दल त्यांनीं कडक शब्दांत कानउघडणी केली आहे तर कित्येक लेखांत इंग्रजी प्रवाशी बातमीदार म्हणून इकडे येऊन कसा मूर्खपणा करितात याचें वर्णन केलेलें आढळतें.

आपल्या मराठी भाषेंत कै० चिपळूणकर शास्त्रीबुवांनीं ज्याप्रमाणें मराठी भाषेची सेवा करून आपलें नांव वाङ्मयेतिहासांत अजरामर करून ठेविलें, त्याप्रमाणें—किंबहुना त्याहूनही जास्त—बंकिमबाबूंनीं नांव मिळविलें आहे. बंकिमबाबूंनीं बंगभाषेस जें वळण लावून दिलें आहे तें चांगलेंच उपयोगी पडलें आहे. हिंदुस्थानांत ज्या अनेक भाषा आहेत त्यांत वाङ्मयाचे दृष्टीनें बंगाली वाङ्मयानें पहिला नंबर पटकाविला आहे. प्रत्येक भाषेंतील पूर्वीचें शिल्लक वाङ्मय सोडून देऊन तर एका शतकांतलें वाङ्मय पाहिलें तर बंगाली वाङ्मयाचा पहिला नंबर कबूल करावा लागेल, याचें श्रेय बंकिमबाबूकडे आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवावी.

येथें बंगाली भाषेसंबंधानें थोडी माहिती करून देणें कांहीं वावगें होणार नाहीं. बंगाली भाषा ही संस्कृतापासूनच बनलेली आहे. बोलण्याची भाषापद्धति व लिहिण्याची भाषापद्धति यांत आपल्या मराठी भाषेप्रमाणेंच अंतर आहे. बंगाली भाषेच्या लिहिण्याच्या पद्धतीनें निम्मे अधिक संस्कृत शब्द आढळतात. कांहीं हिंदी, आरबी शब्द आहेत. ती लिपी साधारणतः आपल्या मराठी सारखीच असून अक्षरें इतकीच आहेत. बंगाली लिपी साधारणतः दोन तीन तासांत व भाषा सुमारें तीन ते सहा महिन्यांत येऊं लागते. ज्याला वाङ्मय पहावयाचें असेल त्यांनीं ही भाषा अवश्य शिकावी.

---

... नं. ...
ता.

## प्रकरण ९ वें.

# करारीपणा.

नोकरी व करारीपणा या दोन्ही गोष्टी एकदम साधणें शक्य नसतें. स्वाभिमान हा पाहिजेच. ज्याला स्वाभिमान नाहीं त्याला मनुष्यपणा नाहीं असें कित्येक लोक म्हणत असतात. स्वाभिमान प्रत्यक्ष व्यवहारात दिसून आला म्हणजे त्याला आपण करारीपणा असें म्हणत असतो. आपल्याला जें खरें वाटतें, जें आपल्याला पटतें त्याप्रमाणें बोलणें व वागणें याचा समावेश करारीपणात करितां येतो हा करारीपणा नोकरी करीत असतां मुळींच चालत नाहीं असा कित्येक नोकरांचा अनुभव आहे.

नोकरी म्हणजे तोंडपूजेपणा होय. आपल्या मालकाचा किंवा वरिष्ठ अधिकाऱ्याचा तोंडपूजेपणा केल्याशिवाय चालतच नाहीं. हाजी हाजी करणे, अवास्तव स्तुती करणें, प्रत्येक गोष्टीस होय म्हणणें, या गोष्टी सामाजिक, धार्मिक किंवा नीतिदृष्ट्या कितीही त्याज्य असल्या तरी नोकरास त्या कराव्याच लागतात. सगळीं कानें तोडून नोकरानें एवढें जरी केलें तरी चालतें. आपली स्तुती न आवडणारा मनुष्य फारच विरळ. अहिल्याबाई सारखी एखादी साध्वी, तुकाराम महाराजासारखें एखादेंच रत्न कोठें तरी चमकत असतें. अशा लोकांना मात्र स्तुती विषासारखी वाटते. बाकी बहुतेक लोकाना; स्तुती कमीजास्त मानानें आवडत असेच.

लोकानीं आपल्याला चांगलें म्हणावें म्हणूनच आपण खटपट करीत असतो. माझ्या बालबधूनों ! हें ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल नाहीं !

पण छे ! तसें मुळींच नाहीं. ही गोष्ट खरी आहे. तुम्हीं अंगावर जे कपडे घालता ते कशा करितां ? शरीर रक्षणास कांहीं दिखाऊ. रेशमी भपकेदार कपड्यांची जरूरी नाहीं. इतकेंच नव्हे तर फाजील कपड्यापासून शरीरास अपायसुद्धा होत असतो. परतु तुम्हीं उन्हाळ्यांत भर दुपारी तीन चार कपडे अंगावर का चढविता ? लोकांनीं वाईट म्हणूं नये म्हणूनच. मग लोकानीं चागलें म्हणावें म्हणूनच आपण वागत असतो असें म्हटल्यानें बिघडलें कोठें !

परतु यांत स्तुती करण्यांतही फरक आहे. एखादा मनुष्य तुमचेकडे येऊन तो स्तुती करू लागला कीं, तुम्ही चटकन् ओळखावें कीं, याला आपल्यापासून कांहीं तरी पाहिजे आहे म्हणून स्वारी लघळपणा करीत आहे. खरें म्हणणें म्हणजे आहे ती स्थिती दर्शविणें व स्तुती करणें म्हणजे धडधडीत खोटें बोलणें होय. कित्येक स्वार्थसाधु लोक नेहमी स्तुती करीत असतात. स्तुती करितां येणें हा एक गुण समजला जातो. व्यवहारांत असें अनुभव बरेच वेळां येतात. जो मनुष्य आपली स्तुती आपल्या तोंडावर करितो; तो आपल्या माघारी आपली निंदा खास करीत असतो. हा नियम लक्षांत ठेवा. वाटल्यास याचा अनुभव घ्या. तोंडपुजे करणारा मनुष्य एक दोन वेळ दुसऱ्यास फसवू शकेल परतु पुढें मात्र त्याची लबाडी बाहेर पडल्याशिवाय रहात नाहीं. सत्य केव्हांही लपून रहात नाहीं. हांजी हांजी करणाऱ्या मनुष्याची तोंड फोड कशी होते याचे वर्णन येथें देत बसत नाहीं.

नोकरी म्हटला कीं हाजी हांजीपणा हा आलाच. वरील अधिकारी कितीही चांगला असो त्याला उपदेश करण्याकरितां असो अगर काम चांगलें करण्याविषयीं असो त्याचें विरूद्ध गेलें कीं खप्पा मर्जी ही व्हायचीच. बहुतेक नोकऱ्यांची ही स्थिती आहे. ही कांहीं लपून रहात नाहीं कीं खोटी म्हणून जात नाहीं. स्वतन्त्रवृत्तीच्या करारी मनुष्याचें हातून

सरळपणें नोकरी पार पडणें शक्य नसतें. एकतर त्याला स्वाभिमान सोडला पाहिजे, सत्याची चाड सोडली पाहिजे व केवळ होयबा होऊन राहिले पाहिजे. तो स्वाभिमान तसाच ठेवील तर नोकरी रहाणार नाहीं. म्हणूनच या दोन्ही गोष्टी परस्पर विरोधी आहेत असे आम्हीं म्हणतो.

बालमित्रानो ! बंकिमबाबूचें चरित्र तुम्हाला कथन करीत असतां हें नोकरीचें चऱ्हाट कां लाविलें हें गूढ तुम्हाला पडले असेल नाहीं ? पण हें गूढ नाहीं किंवा विषयांतरही नाहीं. असा प्रसंग खुद्द बंकिमबाबूवर आला होता तोंच मी तुम्हाला सांगणार आहे. परंतु ती गोष्ट सांगण्या-पूर्वी इतकी माहिती मुद्दाम सांगावी लागली आहे.

बुद्धीच्या जोरावर बंकिमबाबूची उन्नति सारखी होत होती. वाङ्मयांत पहिला मान पटकाविला, त्याचप्रमाणें सरकारी नोकरींतही त्यांनीं पहिला नंबर मिळविला. डेप्युटी माजिस्ट्रेटचा मान मोठा होता तरी थोडे बहूत हिंदू लोक डेप्युटी माजिस्ट्रेट होते. आतापर्यंत ' सेक्रेटरीएट ' मध्यें कोणी सुद्धां हिंदु मनुष्य घेतला नव्हता. ती जागा बंकिमबाबूस मिळाली. सेक्रे-टरीएट मधलें पहिलें हिंदी आसिस्टंट सेक्रेटरी बंकिमबाबू होत बंकि-मबाबूनीं अभ्यास करितांना जो एकदा पहिला नंबर पटकाविला तोच त्यांनीं हातीं घेतलेल्या कार्यांत कायम ठेवीला. हें त्यांच्या सर्व चरित्रांतलें मुख्य तत्त्व आहे.

त्यावेळीं मुख्य सेक्रेटरी मॅकालेसाहेब होते. यांचे हाताखालीं बंकि-मबाबूंना काम करावें लागत असे. मॅकालेसाहेब गुणी होते. विद्वान् होते, कार्यकुशल मुत्सद्दीही होते; त्यांची याबद्दल प्रसिद्धी आहे, परंतु ! परंतु स्वाभिमानी बंकिमबाबूचे व त्यांचे मुळींच जमेना. ते जमावें कसें ! कर्तव्यकर्म म्हणून बंकिमबाबू नोकरी करीत होते. आपल्या या कर्तव्यांत ते कधीं कसूर करीत नसत. यामुळें ते कांहीं कोणाचें ताब्यात असें राहिले

नाहींत. उगाच हांजीपणा करणें हें त्यांना मुळींसुद्धा आवडत नसे. ते कधीं कोणाची तोंडावर स्तुती करीत नसत. आपलें इमानीक काम भलें कीं आपण भलें, असा त्याचा करारी स्वभाव होता. मॅकालेसाहेब म्हणजे कामाचे मोके. हातांत घेतलेलें काम पुरें केल्याशिवाय उठावयाचें नाहीं असा त्याचा बाणा होता. ते कधीं सूर्यास्तापर्यंत कधीं रात्रीं आठनऊ वाजेपर्यंत काम करीत बसत असत. बंकिमबाबू ऑफिस टाईमप्रमाणें अकरास हजर होऊन पाच वाजतां उठत असत. हे मॅकालेसाहेबांना मुळींच खपेना. आपण हेड सेक्रेटरी असून रात्रींपर्यंत कामें करीत असतो व असिस्टंट सेक्रेटरी पाच वाजतां उठून जातो. हें कसें ? हा धडधडीत अपमान होता. कांहीं दिवस असा प्रकार चालल्यावर साहेबबहादूरांनीं एके दिवशीं स्पष्ट सांगितलें कीं बंकिमबाबू ! तुम्हीं रात्रींपर्यंत काम केलें पाहिजे."

यावर स्वाभिमानी, तेजस्वी बंकिमबाबूंनीं स्पष्टपणें जें उत्तर दिलें तें त्यांना साजेसेंच होतें. अशा तऱ्हेचा मनुष्य होयबा होणार नाहीं. बंकिमबाबूंनीं स्पष्ट शब्दांत उत्तर दिलें तें पुढीलप्रमाणें—

" साहेब बहादूर ! आपण राज्यकर्त्यांच्या जातीपैकीं आहात, यामुळें आपली आशा फार मोठी असणार हें उघड आहे. आपण सहज गव्हर्नर व्हाल किंवा प्रसंगीं गव्हर्नर जनरलही बनाल. आता आमचें काय व्हावयाचें आहे ? आम्हीं हिंदु लोक कितीही विद्वान् असलों, कितीही काम आम्हीं केलें तरी आतां कांहीं वरिष्ठ नोकरी मिळत नाहीं हें खास. मग नेमल्यापेक्षां जास्त काम करून आपल्या शरीराची खराबी कां करावी ! "

एका बंगाली गृहस्थाचे तोंडून हे स्पष्ट उद्गार ऐकून साहेब बहादूरास फार आश्चर्य वाटलें. ते स्तब्धच बसले. अशा तऱ्हेनें उत्तर मिळेल अशी कांहीं त्यांची कल्पना नव्हती. होय म्हणून उत्तर येईल असें त्यांना वाटत होतें. परंतु प्रकार असा उलटा घडून आला.

याचा परिणाम जो कांहीं व्हायचा तो झालाच. बंकिमबाबू सर्व गुण संपन्न होते खरे परंतु 'होयबा' चा गुण त्याचें अंगीं नसल्यानें ते असिस्टंट सेक्रेटरी पदास नालायख ठरले. ज्या बंकिमबाबूंच्या योग्यतेचे पोवाडे सर्व लोक गात आहेत, कित्येक वाङ्मय प्रेमी इंग्लिश गृहस्थही याची मुक्तकंठानें स्तुती करीत आहेत तेच बंकिमबाबू होयबा नाहींत म्हणून पुन्हा डेप्युटी माजिस्टेट बनले. परंतु या योगानें कांहीं त्यांच्या योग्यतेंत तीळमात्र फरक पडला नाहीं. त्याचें स्थान अढळ होतें. वाङ्मयसेवा हें त्याचें मुख्य कार्य होते व केवळ निर्वाहाचें साधन म्हणून नोकरी करीत होते. त्यांची नेमणूक अलीपूर येथें झाली. बंकिमबाबू हें होणारें भविष्य ओळखून असल्यानें त्याना याबद्दल कांहींसुद्धां वाटलें नाहीं.

अलिपूरास असताना आणखी एक प्रकार असाच घडून आला. तेथें आपल्या ऑफिसात बसून बंकिमबाबू काम करीत होतें. इतक्यात दुसरे एक बडे मिजासखोर असे एक इंग्रजी माजिस्ट्रेटसाहेब त्याना केवळ त्याचा अपमान करावा म्हणून 'बंकिम' 'बंकिम' म्हणून हाका मारु लागले. हा अपमान बंकिमबाबूंनीं प्रथम थोडावेळ सहन केला परंतु साहेबबहादूरांची लहर कांहीं लवकर पुरी होईना तेव्हां अखेर बंकिमबाबू स्पष्टपणें म्हणाले:—तुम्हीं कोठें आहांत याचा विचार केला आहे कां ? मी यावेळीं बंकिम नसून डेप्युटी माजिस्ट्रेट आहे. या अपमानाचा मला विचार करावा लागेल. मग मात्र आपल्याला कठीण जाईल.

हें खडखडींत बोलणें ऐकल्याबरोबर साहेब नरम पडले. येथें कांहीं आपली मात्रा चालत नाहीं असें त्यांना आढळून आलें. या करारीपणाचा गौरव मात्र कांहीं झाला नाहीं उलट त्यांना त्रास झाला. अलिपूराहून जाजपूरास बदली झाली. तेथें जाऊन हजर होतात तोंच

पुन्हां हुगळीस बदली झाली. कित्येक महिने हुगळीस काढल्यावर तेथून त्याची बदली अलिपूरास झाली. याला कारण जर कांहीं असेल तर तें बंकिमबाबूंचा करारीपणाच होय

ते स्वतः नोकर होतें, त्यांचें बहुतेक आयुष्य नोकरीवर गेलें होतें तरी त्याना नोकरी मुळींच आवडत नव्हती. याबद्दल अनेक गोष्टी सांगतात, परतु केवळ उदाहरणा दाखल एक गोष्ट येथें सांगून ठेवितो. एक चांगल्या बड्या घराण्यापैकीं श्रीमंत गृहस्थ त्याचेकडे आला. त्यानें आपल्या मुलास डेप्युटी माजिस्ट्रेटची नोकरी लावण्याबद्दल गळ घातली. सरकारी नोकरींत ते वशिला वगैरे कांहीं पहात नसत. परोपकार करण्यास ते एका पायावर तयार असत खरें, परतु त्यांत अधिकाराचा मुळीसुद्धा अंश नव्हता. तें त्या बड्या गृहस्थाचें म्हणणें ऐकून घेऊन मोठ्या कष्टानें म्हणाले कीं—आपण मोठ्या घराण्यापैकीं असून चांगलें श्रीमंत आहांत. असें असून तुमच्या मुलानें नोकरी करावी असें तुम्हाला वाटतें ! नोकरीं करण्यात मोठेपणा आहे असें तुम्हाला वाटतें का ! ही तुमची चूक आहे. नोकरासारखें हीनजीणें कोणाचेंही नसतें.

परतु हाय ! दैव कांहीं विचित्रच असतें. अशा तेजस्वीवृत्तीच्या मनुष्यास जन्मभर नोकरी करावी लागली. अशा या नोकरीच्या पारतन्त्र्यांतही तो हिरा आपल्या तेजानें चमकतच राहिला. हेंच मोठें नवल आहे. नोकर लोकाचे हातून उदरभरणाशिवाय कोणतीही गोष्ट झालेली दिसून येत नाहीं. नोकरींत त्यांनीं शरीरच नव्हे तर मनसुद्धां अर्पण केलेलें आढळून येतें. अशा स्थितींत बंकिमबाबूंची कामगिरी पाहिली म्हणजे खरोखर आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं.

ग्रंथ संग्रहालय

नं. ...... मा. ता.

प्रकरण १० वें.

# बंकिमबाबूंचें वाङ्मय.

वाङ्मयाचा दर्जा सख्येवर अवलंबून नसतो. ग्रथांतील विषयांवर हा दर्जा सर्वस्वी अवलंबूल असतो. एखादा मनुष्य एखाद्या विषयाचा जन्मभर व्यासंग करून त्यावर एखादा ग्रंथ लिहित असतो. अशा एकाच ग्रथाची योग्यता मोठी असतें. अशा तऱ्हेचें कांहीं उत्कृष्ठ ग्रंथ प्रत्येक भाषेंत आढळून येतात. संस्कृत भाषेंतही असें बरेंच ग्रथ आढळून येतात. ते ग्रथ तयार होऊन इतके दिवस होऊन गेले तरी अद्यापर्यंत ते प्रमाणभूत धरीले असतात यावरून त्यांची योग्यता कळून येणारी आहे.

बंकिमबाबूंना केवळ ग्रथ रचना करावयाची नव्हती. वाङ्मयात एक प्रकारचें नवें चैतन्य उत्पन्न करून वाङ्मयास एक प्रकारचें वळण लावावयाचें होतें. कोणता विषय लोकाना कसा समजावून सागावा. तो कसा लिहावा याचें प्रत्यक्ष उदाहरण घालून द्यावयाचें होतें. कित्येक लोक केवळ कोणत्याही पुस्तकातील चूका काढीत असतात. अशा लोकाना ‘ टीकाकार ’ असें म्हणतात. अमुक पुस्तकात अमूक एक चूक आहे. भाषा चागली नाहीं अशा तऱ्हेनें पुस्तक परीक्षण करण्याचा प्रघात प्रत्येक देशात असतो. परतु यांत एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट असते. या टीकाकारास तुम्हीं हें या विषयांवर लिहा म्हणून सांगितल्यास तितके तरी लिहिता येईल कीं नाहीं हा प्रश्नच आहे. कित्येक वेळां हास्यास्पद प्रयत्न सुद्धां झालेले आढळून येतात. पहिल्या पुस्तकांत

च्या चूका म्हणून हे टीकाकार दाखवितात, त्याच चूका त्याच्या पुस्त-कांत झालेल्या आढळून येतात. टीकाकारावर टीका करण्याचा टाकाऊ प्रयत्न आम्ही येथें करीत नाहीं. ग्रंथकारांची जशी जरूरी असते अशीच टीकाकाराची ही आहे. सांगावयाचा मूळ मुद्दा म्हणजे सामच्या बंकिम-बाबूंनीं केवळ टीका केली नाहीं. कोणत्या विषयावर कसें लिहावें हें शिकविलें. ही शिक्षणपद्धत फारच चांगली होती. तीच पुढें ठेऊन बंगाली ग्रंथकारांनी आपल्या वाङ्मयाची उन्नती केली आहे.

महाराष्ट्रापूर्वी बंगालप्रांत ब्रिटिश राज्यसत्तेखालीं गेला आहे. यामुळें तेथें शिक्षणाची व्यवस्था चांगली झाली होती. बंगाली लोकांनीं इंग्लिश शिक्षणांत लवकरच प्रगति करून घेतली. बहुतेक धरोधर पदवीधर लोक तिकडे दिसत असतात. या लोकांनीं बंकिमबाबूंचें वळण उचलून त्याप्रमाणें वाङ्मयसेवा करण्यास सुरवात केली आहे. यामुळें बंगाली वाङ्मय झपाट्यानें वाढत आहे.

बंकिमबाबूंनीं ' बंगदर्शन ' व ' प्रचार ' या दोन मासिक पुस्तकांत अनेक विषयांवर लेख लिहिले आहेत. याशिवाय स्वतंत्र पुस्तकरूपानें पुढील पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत.

१ दुर्गेशनंदिनी, २ कपालकुंडला, ३ मृणालिनी, ४ आनंदमठ, ५ देवी चौधराणी, ६ सीताराम, ७ विषवृक्ष, ८ चंद्रशेखर, ९ कृष्णकांताचें उईल, १० राजसिंह, ११ रजनी, १२ इंदिरा, १३ राधाराणी, १ युगलांगरीय, १५ कमलाकांताचें दप्तर, १६ विविध प्रबंध, १७ लोकरहस्य, १८ विज्ञानरहस्य, १९ कृष्ण चरित्र, २० धर्मतत्त्व.

यापैकीं नंबर १ ते १५ कादंबऱ्या आहेत, बाकीचे निबंध आहेत. नंबर १७ लोकरहस्य हे विनोदी लेख आहेत. या कादंबऱ्यांत कांहीं ऐतिहासिक कादंबऱ्या असून कांहीं सामाजिक आहेत. यापैकीं बहुतेक

कादंबऱ्या मराठींत भाषांतरें होऊन आलेल्या आहेत. कित्येक याच नांवांनीं प्रसिद्ध झाल्या असून कित्येक नावें बदलून प्रसिद्ध झालेल्यां आहेत. या कादंबऱ्यांपैकीं 'आनदमठ' ही कादबरी ऐतिहासिक असून त्यांत मुसलमान राजसत्तेचा शेवटचा काल आहे. यावेळीं 'सतान लोकाचें बंड झालें होतें. त्याचवेळीं ब्रिटीश सरकार नसून कंपनी सरकार असून त्यांचा ताबा बसत होता. याचवेळीं हें बड झालें आहे. मायभूम पारतंत्र्यातून मुक्त करण्याकरितां तिकडे एक पथच स्थापन झाला असून तो आपणास मातृभुमीचें 'सतान' असें समजत असे. याचें वर्णन बकिमबाबूनीं फारच उत्कृष्ठ तऱ्हेनें केलेलें आहे. मुसलमान राज्यसत्ता सूर्याचा अस्त होवून ब्रिटीश राज्यसत्ता चद्राचा उदय होणें ही परमेश्वरी आशा आहे. ही ब्रिटीश राज्यसत्ता चद्राकिरणाप्रमाणें सर्वांगीं सुखदायी होईल असा त्या कादबरीचा शेवट केला आहे. 'वंदेमातरम्' नामक एक राष्ट्रगीत सस्कृत भाषेंत सुप्रसिद्ध आहे. हें राष्ट्रगीत बकिमबाबूनीं तयार केलें असून तें आनंदमठ या कादबरींत आहे. या कादबरीची लिडर वारख्यानींसुद्धा वाहवा केली आहे. कपालकुडला कादबरींत धार्मिकबाबी-बद्दल कोरडे ओढलें आहेत. दुर्गेशनंदीनी हें एक ऐतिहासिक कथानक आहे. राजसिंहाचें कथानक इतिहास प्रसिद्धच आहे. लोकरहस्यांत विनोद दाखवून टीका केली आहे. यांत काहीं एकच विषय नसून निरनिराळ्या विषयांवर छोट्या छोट्या गोष्टी लिहिल्या आहेत. या गोष्टी मनोरंजक तर आहेतच पण विनोदी असून मार्मिक आहेत.

याप्रमाणें त्यांच्या पुस्तकाचा सारांश देत बसलों तर चरित्र फारच लाबेल व ती गोष्ट विषयातरावर जाईल म्हणून फक्त त्याच्या नावाचा उल्लेख करूनच आम्हांला हात आंखडता घ्यावा लागत आहे. बकिमबाबूच्या लिहिण्यात मुख्य तत्त्व म्हणजें धर्म हें होय. धर्म व वाङ्मय याची जोड त्यानीं फारच चांगली बसविली होती. कोणताही एखादा नवीन

विषय घेतल्यास तो आपल्या धर्माप्रमाणें कसा काय आहे याचा ते विचार करीत व तो जर आपल्या धर्मास अपायकारक असेल तर तो मुळींच घेत नसत. यामुळेच त्यांच्या लेखनाची गोडी लोकांस फार लागली.

त्याचें प्रत्येक विषयावरील लेख पाहिले म्हणजे त्यांचें सर्व विषयावर कसें प्रभुत्व होतें याचा उलगडा सहज पडतो. त्यानीं प्रत्येक विषयाचें वाचन अभ्यासाचें दृष्टीनें केलें होतें, व्यर्थ भाराभर केलें पाठांतर अशी त्याची स्थिती मुळींच नव्हती. माझ्या बालमित्रांनो ! तुम्हांला वाचनाची गोडी आहे तर तुम्हीं कोणताही विषय वाचीत असतां नीट लक्षपूर्वक वाचा. वाचल्यानंतर काय वाचलें याची आठवण करा. त्यांतलें सार काढून ते टिपून ठेवा. त्यावर शांतपणानें विचार करून तेही पण लिहून ठेवा. यायोगानें तो विषय तुमच्या मनावर चांगला बिंबेल असा मानसशास्त्राचा सिद्धांत आहे.

आपण मोठें व्हावें असें सर्वांना वाटत असतें. पण मोठें म्हणजे काय व तें कसे व्हावें हेंच कळत नाहीं. तुम्हांला मोठे व्हावयाचे असल्यास तुम्हाला मोठ्या लोकांची चरित्रें नीट वाचिलीं पाहिजेत. त्यानीं ज्या मार्गांनीं प्रयत्न केलें असतील त्या मार्गांनीं तुम्हाला प्रयत्न केलें पाहि-जेत. तरच तुम्हीं मोठें व्हाल. मोठेपणा उगाच बसून येत नाहीं कीं मी मोठा म्हणून मिळत नाही. तुम्हाला व्यापारी होवून खूप पैसा मिळवून मोठे व्हावयाचें असल्यास धाडसी व्यापाऱ्याचीं चरित्रें वाचिलीं पाहिजेत. लेखक होवून आपलें नांव चमकावें कसें वाटत असल्यास लेखकांच्या चरित्राचा अभ्यास केला पाहिजे. राजकारणी व्हावयाचें असल्यास राजका-रणपटु लोकांचीं चरित्रें पाहिलीं पाहिजेत. कारागीर व्हावचें असल्यास त्यांचीं चरित्रें वाचलीं पाहिजेत.

चरित्रें वाचून काम झालें असें मात्र समजू नये. चरित्रानें फक्त मार्ग सांपडतो. मग पुढें चिकाटीनें, सतत अभ्यास केला पाहिजे. एकदां एखादा विषय हातीं घेतल्यावर तो पुराच केला पाहिजे. हें थोडें ते थोडें अशानें एक धडना भाराभर त्या चिंध्या कशाला अशी स्थिती होऊन बसतें. त्यातल्या एकाचाही उपयोग होत नाहीं. अशा तऱ्हेनें प्रयत्न केल्यावर यश हें मिळालेंच पाहिजे. केवळ नशीब, दैव म्हणून जर तुम्ही स्वस्थ बसाल तर कांहीं उपयोग होणार नाहीं. या नशीबास प्रयत्नाचे पाय पाहिजे आहेत. ही गोष्ट लक्षांत ठेवल्यास तुम्ही मोठे व्हाल.

आतां आपण बंकिमबाबूंच्या चरित्राच्या शेवटच्या भागाकडे वळू या. करारीपणामुळें त्याचें कोणाशीं पटेनासें झालें. त्याचा स्वाभिमान नेहमीं जागा असे. ते म्हणजे चढेल होते अशांतला भाग नाहीं, परंतु जर कोणी अपमान केला तर मात्र त्यांना मुळीं खपत नसे.आपण नोकरी करीत आहोंत म्हणून हा अपमान होत आहे असा त्यांचा ग्रह झाल्यावर त्यांनीं इ. स. १८९१ त पेन्शन घेतलें.

नोकरींतून मोकळे होवून पेन्शन घेतलें कीं आपलेकडे बहुतेक लोक स्वस्थ बसून रहातात, परंतु बंकिमबाबू त्या प्रकृतचि नव्हते. ते कलकत्यास येऊन राहिल्यावर 'साहित्य' पत्राचे संपादक झाले. यातून वेदावर कांहीं लेख आले आहेत. यानतर बंकिमबाबूंची दृष्टी हिंदू-धर्म शास्त्राकडे वळली. प्राचिन शास्त्रें शोधून काढून तीं प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न त्यांनीं चालविला. हें काम कांहीं सोपें नव्हतें. कारण पूर्वीचीं शास्त्रें हातानीं लिहिलेली असल्यानें नजरचुक, हस्तदोष म्हणून अनेक चूका राहिलेल्या असावयाच्या. म्हणून जितक्या हस्तलिखीत प्रती मिळतीळ तितक्या जमवून त्यावरून शुद्धपण करून मग प्रसिद्ध करावें लागत असे. परंतु त्याचें हें काम अपुरें राहिलें. त्यांच्या मनातलें हे बेत दैवगतीमुळें मनातच राहून गेलें.

त्यांना बहुमूत्राचा रोग पुष्कळ दिवसाचा होता. तो विकार जास्तच वाढला. अखेर तारीख २६ चैत्र वगशक १३०० साली त्यांचा अंत झाला. म्हणजे इ. सन १८९३ साली ते वारले. वंग साहित्य सभाटचा अत झाला. त्यानतर बगाल्यात अनेक नोकर झाले, विद्यार्थी आहेत व लेखकांचा भरणाही पुष्कळ आहे, परतु बंकिमबाबूसारखा पहिला नबर अद्याप कोणालाही मिळाला नाहीं. म्हणूनच त्यांची कीर्ति मागें राहिली आहे.

## तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी.

असें जे श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे तें या साठींच. थोराचें हें वाक्य थोरच पूर्ण करू शकतात.

सरकारी नोकरीवर असता बंकिमबाबूंनीं आपलें काम फारच उत्कृष्ट प्रकारें बजाविलें होतें. त्याच्या स्वाभिमानी स्वभावामुळें कित्येकाशीं पटत नसे ही गोष्ट वेगळी. या योगानें काहीं त्यांनीं केलेल्या कामाची जाणीव नाहींशीं होत नाहीं. बंकिमबाबूची योग्यता जाणून, त्याची एकनीष्ठ नोकरी लक्षात आणून सरकारानीं त्याना ' रावबहादूर ' व ' सी. आय. ई. अशा पदव्या अर्पण केल्या होत्या. म्हणूनच सर्व लोक त्याना ' रायबहादूर बंकिमचद्र चाट्टे पाध्याय सी. आय. ई असें म्हणत असतात.

बंकिमबाबूना पुत्र नव्हताच. तीन मुली पैकीं त्याच्या मृत्युचे वेळीं दोन मुली होत्या. या मुलींस मुलेबाळें झालीं होती. पेन्शन घेतल्यापासून बंकिमबाबू कलकत्यासच रहात होते.

सपलें. बालसख्यानो ! बंकिमबाबूचें चरित्र सपलें, परतु आपलें काम अद्याप सपले नाहीं. तुम्ही असें गोंधळात पडू नका. काय काम राहिलें आहे तें तुम्हाला सांगतों. परतु येथें सांगणार नाहीं. उरलेले काम महत्वाचें असल्यानें वेगळ्या प्रकारणांतच तें सागितलें पाहिजे. मग थोडावेळ थाबा पाहू.

## प्रकरण ११ वें

—:*:*:—

# काय शिकावें ?

—:*:*:—

बाल सवगड्यानो ! आतापर्यंत तुम्हीं हें चारित्र वाचलेत. एवढ्यावें तुमचें काम भागलें असें समजू नका. इतकेंच नव्हे तर जें कांहीं काम आहे तें पुढेंच आहे हें लक्षात ठेवा. आपल्या पुराणात अशी एक पद्धत आहे कीं सर्व पुराण म्हणजे मुख्य भाग झाल्यावर तें पुराण वाचल्यापासून किंवा ऐकल्यापासून काय होतें याचें वर्णन केलेलें असतें. अशी पद्धत लहान मोठ्य । पुराणांत असते. आपलें हें पुराण नसून चारित्र आहे तरी पण यापासून काय फायदे होतात हें पाहिलें पाहिजे. फायद्याशिवाय कांहीं आपण कोणतीही गोष्ट करीत नाहीं. केवळ चारित्र वाचून पुण्य लागो अगर न लागो परतु त्यापासून आपल्याला कांहीं फायदा घेता येतो का हें पाहिलें पाहिजे. यातच काय तें महत्व आहे. कशापासून काय शिकावें हें सुद्धा शिकावें लागतें. कोणतेंही पुस्तक वाचल्यानें फायदा होत नाहीं. त्या वाचनापासून आपण काय शिकावयाचें असेल तें शिकलें तरच फायदा होत असतो. आपण आतांपर्यंत चरित्र वाचलें, आता यापासून आपल्याला काय शिकता येईल हें आपण पाहू या.

बालसख्यानो ! तुमच्या प्रमाणें बंकिमबाबू एकेकाळीं लहान होते, विद्यार्थी होते, शिकत होतें. त्यांचें नाव सर्व लोकाचें मुखीं होण्यास काय कारणें झालीं तीं पाहिलीं पाहिजेत. लहानपणीं त्यांनीं अभ्यास कसा केला. यातच त्यांच्या सर्व आयुष्याचे बीज आहे. या ज्ञानबीजा-

चाच पुढें वृक्ष होऊन त्याला मधुर फळें आलीं आहेत. बंकिमबाबूप्रमाणें आपणही मोठें होवून लेखक व्हावें, ग्रंथकार बनावें, वाङ्मयसेवा करावी असें तुम्हाला वाटते आहे ? असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही त्याप्रमाणें प्रयत्न करा.

बंकिमबाबूची उपजत बुद्धिच तीक्ष्ण होती, ही गोष्ट त्यांच्या चरित्रावरून स्पष्ट दिसते आहे खरीही बुद्धि काहीं सर्वांना सारखी नसते. उपजतबुद्धि अभ्यासानें मिळत नसून ती ईश्वरी देणगी आहे. तेव्हा त्याबद्दल काहीं लिहिता येणेंच शक्य नाहीं. आतां त्यानंतर त्यानीं अभ्यास कसा केला याचें वर्णन चौथ्या प्रकरणात आलें आहेच त्यावरून तुम्ही काय बोध घ्याल ? अभ्यास करीत असता नीट लक्ष ठेविलें पाहिजे, मन लावून कोणताही अभ्यास केला पाहिजे. तुम्हीं असा कधीं अभ्यास केला आहे का ? केला नसल्यास फिरून एकदा करून पहा. तुम्हीं अभ्यास करिता परंतु त्यात तुमचे मन असतें का ? केवळ वाचून किंवा घोकून अभ्यास होत नाहीं. नीट लक्षपूर्वक केलेला अभ्यास थोड्यावेळात होऊन चांगला होतो. लक्ष एकीकडे ठेऊन पुष्कळ वाचलें किंवा घोकून काढले तरी त्याचा उपयोग होत नसतो. म्हणून ही गोष्ट अभ्यास करिताना नीट लक्षांत ठेवावी.

दुसरी गोष्ट चिकाटीची होय. कोणताही अभ्यास चिकाटीने केला पाहिजे. फावलें तेव्हा, कसा तरी अभ्यास केल्यास तो चांगला कसा होईल ? सतत श्रम केल्याशिवाय मुळीं भागणार नाहीं. बालपणीं अभ्यास करणें हेंच कर्तव्य असतें तेव्हा याची हेळसांड करिता कामा नये. बंकिमबाबूच्या चरित्रापासून हा गुण घेण्यासारखा आहे.

कोणताही विषय नीट समजावून घेतल्याशिवाय त्याचा उपयोग होत नाहीं. एखादा विषय समजला नसला तर त्याचा परिणाम मनावर होत नाहीं, विषय नीट समजावून घेतल्यावर त्याचा ठसा मनावर चांगला

उमटतो. विषय समजला नाहीं तर त्याचा अस्पष्ट ठसा मनावर उमटत असतो त्यामुळें तो थोडावेळच टिकत असतो.

केवळ शाळेत चालणाऱ्या पुस्तकांतच सर्व ज्ञान सांठविलें आहे असें समजू नये. बंकिमबाबूंनीं हाच मार्ग स्विकारला होता. त्यांनीं वाचन वाढविलें होतें. जितकें वाचन होईल तितकें कमी आहे. वाचनासारखा सोबती या जगात दुसरा कोणींही नाहीं. मला हें वाचन केव्हा करावें याचाही येथें खुलासा केला पाहिजे. वाचन चांगलें, ज्ञानदायक आहे म्हणून जर तुम्ही अभ्यास न करितां सारखे वाचित सुटला तर फायदा न होता तोटा मात्र हटकून होईल. अभ्यास करणें हें कर्तव्य आहे. या बाबतींत बंकिमबाबूंचा अनुभव काय सांगतो आहे ! त्यांचें चरित्र काय सांगतें ! त्यांनीं प्रथम आपला अभ्यास केला, नंतर त्याच विषयावरील पुढचा अभ्यास केला व उरलेला वेळ वाचनांत घालविला. ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे. वाचनाची गोडी लागणें फार जरूरीचें असतें. प्रथम कोणचीही दृष्टी मनोरंजक गोष्टीकडेच वळत असतें. म्हणूनच कादंबरी वाचकांना भरणा फार असतो. कादंबरी वाचनानें फायदा थोडा होत असतो. हें विसरून चालणार नाहीं. सर्वत्र कादंबऱ्या चांगल्या असतात असें कांहीं नाहीं. कित्येक तर मुलाचे हातात न देण्यासारख्याही असतात. वाचनानें पुस्तकांत हीं सुधारणा करून घ्यावी. थोर पुरुषांचीं चरित्रें, ऐतिहासिक गोष्टी, स्वतंत्र विषयावरील ग्रंथ यांचें वाचनानें ज्ञानात भर पडत असते. सर्व जग ज्ञानानें भरलें आहे. सर्व ज्ञानाची साधारण माहिती करून घेऊ म्हटलें तरसुद्धा आपला जन्म पुरणार नाहीं. कितीतरी जन्म घ्यावे लागतील. ज्ञानास पार नाहीं. तुम्ही शिकावयाचें सोडिलें म्हणजे सर्व ज्ञान संपलें असें समजू नका. अगदीं मरेपर्यंत ज्ञान मिळवित राहिलें पाहिजे. या बाबतींत बंकिमबाबूंचें चरित्र हेंच सांगत आहे.

बंकिमबाबूंना नोकरी आवडत नव्हती हें तर स्पष्ट आहे परंतु केवळ पोटाकरितां ते नोकरी करीत होते. परंतु त्या नोकरींत त्यांनींसुद्धा हयगय केली आहे का ? नोकरी करणें हें आपलें कर्तव्य आहे. तें कर्तव्य नीट-पणें पार पाडलेंच पाहिजे असें म्हणून तें त्याप्रमाणें वागत होतें. ही गोष्ट शिकण्यासारखी आहे.

स्वाभिमान ते नोकरी करीत असताही करारीपणानें वागत होते हें मुळ आहे. तोंडापुरता चोंबडेपणा करणें त्याना मुळीं आवडत नसे कीं ते कोणाचा फाजील दिमाख चालू देत नसत. मात्र स्वाभिमान म्हणजे फाजील चढेलपणा नव्हे. वाटेल त्याच्यावर तोंडसुख घेणें हें काहीं त्याना आवडत नाहीं. चढेपणानें वागणें, आपल्याच ऐटींत मिरविणें, दुसऱ्या मनुष्यास तुच्छमानणें हे गुण नसून याला दोष असें म्हणतात. तेव्हा हे दोष टाळून गुण तेवढाच घ्यावा.

सतत उद्योग करणें यानेंच बंकिमबाबूंचें चरित्र इतकें वाढलें आहे. त्यांनीं म्हातारपणींच नव्हे तर अगदीं मरेपर्यंत सारखे श्रम केलें आहेत. माझ्या खेळगड्यानो ! ही गुरुकिल्ली नीट सांभाळा. ' सतत उद्योग, हे दोनच शब्द आहेत परंतु हे मात्र बालपणापासून मरेपर्यंत सारखे पुरतात पहा. एखाद्यास मोठेपणा येणें सत्वरच अवलंबून आहे. ' आळस हा कुटुंबाचाच नसून शरिराचाही वैरी आहे. ही गोष्ट तुम्ही नीट आपल्या हृदयकमलावर कोरून ठेवा. हें विसराल तर तुम्ही खास घसराल.

पैसा मिळविणें हें कर्तव्य आहे. पैशाशिवाय जगात कोणताही व्यवहार घडत नसल्यानें पैसा म्हणजे परब्रह्म बनला आहे. केवळ पैसा मिळविणें करितां आपण या जगात आलो नाहीं खास. व्यवहारातली एक जरू-रीची वस्तु म्हणूनच त्याची योजना समजली पाहिजे. पैशाला जगात मान आहे असें कित्येक म्हणतात परंतु तो भ्रम आहे. गुणाला पूज्यस्थान देतात. वाङ्मय सेवा करणें म्हणजे जवळ जवळ पैसा लाभाडणें आहे.

पैशाचे मार्गे लागलेल्या मनुष्यास वाङ्मय, अथ कांहींच माहिती नसते. परतु अखेर त्याचा शेवट पैशातच होत असतो. अशा लोकास कोणी समजस मनुष्य जास्त मान देणार नाहीं. गुणास मान सर्वत्र तेथें मिळत असतो.

बंकिमबाबूंचें घराणें श्रीमंतीचे नसूनही त्यानीं सर्व देश हादरून सोडला. वाङ्मयास एक प्रकारचें वळण लावून दिलें व आपलें नांव अजरामर करून ठेविले आहे. सर्व लोक त्याना ' साहित्य सम्राट म्हणत असतात. त्यानीं कसें प्रयत्न केले याची माहिती चरित्रांत येऊन गेलीच आहे. घराणें गरीब असतांही शिक्षच सपादन करिता येतें व वाङ्मयसेवा करितां येते याचें उदाहरण जगास दाखवून बंकिमबाबू गेले आहेत.

ब्रिटिश राजसत्ता नुकतीच स्थापिली गेली असल्यानें सुधारणेचा भपका लोकास फार वाटत होता. कित्येक लोक या सुधारणेचे पुरते भक्त बनले होते. ते मुळीं आपल्या पहिल्या गोष्टीकडे मुळींच लक्ष देत नसत. देव, धर्म वगैरे सर्व झुट आहे असे ते म्हणत असत तर दुसरा पक्ष इंग्रजी भाषा बोलणें सुद्धा पाप आहे असें म्हणून जुन्याचा अभिमान धरित असत. या दोन्हीही गोष्टी अती असल्यानें बंकिमबाबूंनीं त्यावर सारखेच कोरडे ओढिले आहेत. आपला धर्म साभाळून जितकें नवीन ज्ञान घेता येईल तितकें घ्यावयाचे असें त्याचें धोरण असे. त्याच्या चरित्र वाचकानीं हा सुद्धा गुण अवश्य घ्यावा.

कशीही स्थिती असली तरी आपली इच्छित गोष्ट तडीस नेण्याची घडाडी धरणें, धैर्य असणें या गोष्टी बंकिमबाबूंच्या चरित्रापासून शिकण्यासारख्या आहेत. धैर्य धरणे हा गुण सर्वांत अगदीं अवश्य पाहिजे असतो. उतावीळपणाने, गडबडीनें कोणतेही काम शेवटास न जातां सर्व श्रम वाया जातात. काम करिताना तडफ ही पाहिजेच असते परतु

'तडफ म्हणजे गडबड मात्र नव्हे. हा भेद नीट लक्षांत ठेविला पाहिजे.

बंकिमबाबूंना आरंभी विद्येची गोडी लागली होती त्यांनीं त्यावेळीं जितकें ज्ञान मिळविता येईल तितकें मिळविलें होतें. त्यात कांहीं कम-तरता पडू दिली नाहीं. अभ्यास संपल्यावर त्यानीं जबाबदारीची नोकरी सांभाळूनही वाङ्मय सेवा केली यावरून कटाळा न करिता काम कर-ण्याची हातोटी पाहण्यासारखी दिसते.

बाल बंधुनो ! बंकिमबाबूंना मरून आता १८ वर्षे झालीं आहेत. त्याची कीर्ति आहे तशीच नव्हे तर दिवसें दिवस वाढती आहे. त्यांनीं केलेल्या पुस्तकापैकीं काहीं पुस्तकांच्या १४।१५ आवृत्या निघाल्या आहेत, इतकी त्यांची पुस्तकें लोक प्रिय झालीं आहेत. त्यांच्या पुस्त-कांची हिंदी, गुजराथी, मराठी या भाषेंतच नव्हे तर इंग्लिश भाषेमध्यें सुद्धा भाषातरें झालीं आहेत व होत आहेत.

बंकिमबाबूंनीं सरकारी नोकरी सांभाळूनच नव्हे तर चांगला गौरव करून घेऊनही वाङ्मयसेवा केली आहे. पहिले बंगाली बी. ए. पहिले हिंदी अ. सेक्रेटरी. म्हणूनच बंकिमबाबूंची कीर्ति आहे. ते केवळ नावाचे राजमान्य न राहता खरोखरच 'राजमान्य' झाले होते. इतकें असून ही वाङ्मयातही ते वाङ्मय सम्राट बनले. ही गोष्ट साधी, सोपी नव्हे. कारण—

नरपति हितकर्ता द्वेष्यताम् याति लोके ।
जनपद हितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ॥
इति महति विरोधे विद्यमाने समाने ।
नृपति जनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥ १ ॥

अर्थः—राजाचें हित करणाऱ्या मनुष्याचा इतर लोक द्वेष करितात. इतर लोकांचे कल्याण करूं इच्छिणारा मनुष्य राजास शत्रू समान वाटतो अशी वस्तू स्थिती आहे. राजहित व प्रजाहित हीं दोन्ही साधणारा मनुष्य फारच दुर्लभ असतो.

बंकिमबाबूंनीं या दोन्ही गोष्टी साधल्या असल्यानें त्यांची योग्यता फार मोठी आहे. ते कांहीं राजकीय पुढारी नव्हते. त्यांनीं फक्त वाङ्मय-सेवाच केली आहे. अशा तऱ्हेनें त्यांनीं आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे.

बंकिमबाबूचा इतका परिचय करून देऊन आम्ही तूर्त दुसऱ्या परिचयाची तयारी करितां आमच्या बाल वाचकांची रजा घेतों.

नं.
ता.

RFBK-0002480